बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार,दि.७ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२८९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# राज्यात अतिवृष्टीचा धोका

पुन्हा पावसाचा जोर वाढणार

हवामान विभागाने वर्तविला अंदाज

नदी नाले वाहण्याची शक्यता

## २६ जिल्ह्यांना यलो अलर्ट केला जारी

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कालपासून म्हणजे ५ जूनपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला असून सध्या काही भागात पाऊस पडत आहे, तर काही भागात पावसाने उगडीप दिली आहे. गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. दरम्यान, अशातच राज्यातील २६ जिल्हांना यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. आज वादळी वारे, विजा आणि मध्यम पर्जन्याची शक्यता आहे.

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात ७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. शेतक-यांचे १० जून पर्यंत शेत नाही तयार झाले तर १०, ११ आणि १२ जून तीन दिवस शेत तयार करायला पुन्हा चान्स मिळेल. राज्यात १३ ते १८ जून मुसळधार पाऊस पडणार आहे. ठिकठिकाणी ओढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे. गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. नदी नाले दुधतडी भरुन वाहत आहेत. दरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. तसेच काही भागात जास्त पाऊस पडल्यामुळे शेती पिकांचे देखील नुकसान झाले आहे. अशातच पुन्हा राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आली आहे.



### १३ जून ते १८ जूनच्या दरम्यान मुसळधार पाऊस

पूर्व विदर्भ, पश्चिमी विदर्भ, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकणपट्टी, खान्देश, मराठवाडा सगळ्या विभागामध्ये ७, ८, ९ जून दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. पण त्याच्यानंतर १३ जून ते १८ जूनच्या दरम्यान खूप मुसळधार पाऊस पडणार, तर काही ठिकाणी अतिवृष्टी देखील होईल. म्हणजे ओढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे.

### कोणकोणत्या जिल्ह्यांत पाऊस?

कोकण विभाग :
ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी
हलका ते मध्यम पाऊस .
पश्चिम महाराष्ट्र
पुणे, सातारा, सांगली, सोलापूर
घाटभागात वाढलेला पर्जन्य अंदाज.
मराठवाडा व विदर्भ :
नाशिक, धुळे, जळगाव, अमरावती, नागपूर, वर्धा
विजेसह मध्यम पाऊस, वा-याचा वेग ३० ते ५० किमी/तास .

**अलर्ट जिल्हे**
गोंदिया, भंडारा
नंदुरबार, लातूर

**कोरडे हवामान**
७ ते १० जूनच्या दरम्यान
भाग बदलत पाऊस पडणार

# बीडमध्ये उभारणार सहकार संकुल

डॉ.योगेश क्षीरसागर:१४ कोटी ९८ लाखांची मान्यता




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरातील नगर भूमापन क्र.१७९९ या मालकीच्या जागेवर ‘सहकार संकुल’ इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे १४ कोटी ९८ लाख रुपये इतक्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाकडून बुधवारी (दि.४) प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय पान २ वर



**परळी:** शहरातील बीकेएस गार्डन येथे शुक्रवारी संजय सुरवसेंची कन्या अनुराधा हिचा विवाह वैभव रघुनाथ भोसलेंशी पार पडला. यावेळी अमर देशमुख, भगवान साकसमुद्रे, विजय भुतडा,पांडुरंग काकडे, अतुल चौधरी, वैभव आंबेकर, सचिन स्वामी आदी शुभेच्छा देताना

# केजमध्ये पहलगाम घटनेचा निषेध !

निवेदन:भारताने पाकला धडा शिकवावा



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:काश्मीरच्या पहलगाम येथे अतिरेक्यांनी २८ भारतीय पर्यटकांच्या केलेल्या हत्येचा केजच्या नागरिकांकडून तीव्र निषेध व्यक्त केला असून गरज पडल्यास भारत सरकारने पाकिस्तान वर कठोर सैनिक कार्यवाही करावी अशी मागणीही केजच्या नागरिकांच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे.

२२ एप्रिल रोजी काश्मीरच्या पहलगाम येथे फिरायला गेलेल्या निष्पाप पर्यटकांवर अतिरेक्यांनी अंधाधुन गोळीबार करून २८ पर्यटकांची क्रूरपणे हत्या केली. या घटनेने संपूर्ण देश व विश्व हादरून गेले. विशेष म्हणजे हे अतिरेकी सुरक्षितपणे पसारही झाले.पसार झालेल्या अतिरेक्यांना शोधून फाशीवर लटकवा व हा दहशतवाद पाकिस्तान पुरस्कृत असल्याने गरज पडल्यास पाकिस्तानला युध्दाद्वारे धडा शिकवा अशी मागणीही नागरिकांनी केली. वरील मागणीचे निवेदन केज तहसीदार यांना देण्यात आले आहे. निवेदनावर हनुमंत भोसले, भाई मोहन गुंड, मेजर अजिमोद्दीन शेख, ऍड निखिल बचुटे, सोमनाथ नागरगोजे, महेश जाजू, विकास अप्पा मिरगणे, गोविंद जाजू, पान २ वर

# पावसाळ्यापूर्वी स्वच्छतेचे प्रश्न सोडवा

सुहास पाटील: नागरिकांच्या घरात पाणी गेल्यास नुकसान भरपाई द्यावे

प्रतिनिधी पुण्यभूमी



बीड: काही दिवसापूर्वी बीड मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे बीडकरांची तारांबळ उडाली अनेकदा शहरातील मुख्य व गल्लीतील रस्ते जलमय झालेले पाहवयास मिळाले होते. नगर पालिका प्रशासन नालेसफाई करत नसल्यानले पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी बीड शहर सतत जलमय होत आहे. येणाऱ्या काळात मान्सूनचे पाऊस होणार आहेत अशा वेळी बीड शहर जलमय होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तात्काळ बीड शहरात मान्सून पूर्व नालेसफाई आणि स्वच्छतेचे काम पूर्ण करावेत असे पत्रकात शिवसंग्राम शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी म्हटले आहे.

बीड नगरपालिकेने पावसाची चाहूल लागण्याआधीच संपूर्ण शहरातील नालेसफाईची कामे अत्यंत तातडीने पूर्ण करणे गरजेचे आहे . अवकाळी पावसाने नदी -नाले एक झाले . महाराष्ट्रात सात जूनच्या नंतर मान्सूनचे आगमन होत असते. नगरपालिकेने जलदगतीने पावले उचलून नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेत संपूर्ण शहरातील नालीसफाई पूर्ण करणे गरजेचे आहे. थोड्या पान २ वर

# नगरला भारत जिंदाबाद यात्रा

नियोजन:सुनील साळवेचा नेतृत्वाखाली रॅली



पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी: केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले यांच्या आदेशानुसार व जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या नेतृत्वा खाली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून रॅली भव्य तिरंगा रैली काढण्यात आली

या वेळी हातात तिरंगा झेंडा घेऊन कार्यकर्ते घोषणा देत होते, शिंदूर ऑफरेशन यशस्वी केल्या बद्दल भारतीय सैनिकाचे मनोबल वाढविण्यासाठी रिपाई च्या वतीने अहिल्यानगर येथे पान २ वर

परळीत कार्यशाळा | मंत्री पंकजा मुंडेंचे निर्देश

# दिवाळीपूर्वी घरकुलांचे टार्गेट पूर्ण करावे!

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:प्रत्येकाच्या डोक्यावर हक्काचे छत असणे ही खूप मोठी गोष्ट आहे दारिद्र्य ही सर्वात मोठी पीडा असून दारिद्र्याची व गरिबीची जाण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना असल्याने त्यांनी अतिशय कार्यबद्ध पद्धतीने संपूर्ण देशभरात प्रत्येकाला हक्काचे घर देण्यासाठी घरकुल योजना सुरू केलेल्या आहेत परळी अंबाजोगाई तालुक्यात घरकुलांचे उर्वरित टार्गेट पूर्ण करा व दिवाळीपूर्वी प्रत्येकाच्या हातात घरकुलाची चावी द्या या दृष्टीने काम करा असे निर्देश राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज इथे दिले.



शहरातील नटराज रंगमंदिरात परळी व अंबाजोगाई पंचायत समिती, ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने दिवाळी नवीन घरकुलात उपक्रम कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. आ.धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, उपविभागीय अधिकारी अरविंद लाठकर, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, समृद्धी दिवाणे आदी यावेळी उपस्थित होते.या कार्यशाळेत घरकुल योजनांच्या अंमलबजावणीसाठी विविध पातळ्यांवरील अडचणींवर चर्चा करण्यात आली. जिल्हा प्रशासनाला उद्देशून स्पष्ट संदेश देताना ना. पंकजाताई मुंडे यांनी अधिकाऱ्यांना सजगतेने आणि संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले. रोहयो, महसूल, आणि ग्रामविकास विभाग यांनी परस्पर समन्वय ठेऊन काम केले पाहिजे, म्हणजे दिवाळीपर्यंत लाभार्थ्यांना स्वतःच्या हक्काच्या घरात जाता येईल असे त्या यावेळी म्हणाल्या.

ग्रामविकास मंत्री म्हणून काम करत असताना घरकुलांच्या योजनेबाबत भरपूर काम केले. त्यावेळी शिर्डी येथे पंतप्रधान पान २ वर

### निधी अडविण्याचे प्रकार सहन करणार नाही

शेतकऱ्यांचे विहिरीचे, गोठयाचे पैसे दिले जात नाहीत, त्यात काय लाभ आहे? रोजगार हमी योजनेत (रोहयो) काही ठिकाणी अडवणूक केली जातेय, मला विचारल्याशिवाय बीलं काढायची नाहीत असा दबाव आणला जातो असले प्रकार जिल्ह्यात खपवून घेणार नाही. सीईओ, कलेक्टर तुम्ही कोणाच्याही दबावात येऊ नका. असं जर कुणी करत असेल तर त्याला रेकॉर्डवर घ्या आणि अजित दादांकडे मांडा. आमदार-खासदार हे जनतेच्या सेवेसाठी आहेत. जनतेची विधायक कामे करण्यासाठी आहेत. मी स्वतः असो की जिल्ह्यातील कोणताही लोकप्रतिनिधी असो अशा पद्धतीने काम चालणार नाही. ’अडवा आणि जिरवा’ ही संस्कृती बीड जिल्ह्यात चालणार नाही असा स्पष्ट इशाराही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी यावेळी दिला.

# बीडमध्ये वंचितकडून परिसंवाद

मिलिंद सरपते:नागरिकांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड :डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे व वंचित समाजाच्या हक्कासाठी लढणारे ॲड. प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर यांच्या कार्याची सखोल मांडणी करण्यासाठी बीड येथे विशेष परिसंवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

८ जून २०२५, रविवार, दुपारी १ वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे होणाऱ्या या परिसंवादात प्रकाश आंबेडकर यांच्या विचारधारेची, राजकीय भूमिका पान २ वर

## चेंगराचेंगरीनंतरचे कवित्व

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आयपीएलचे जेतेपद संपादन केल्यावर बुधवारी बंगळुरूतील चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित केलेल्या सत्कार समारंभादरम्यान चेंगराचेंगरी झाली अन् ११ जणांचा मृत्यू झाला. या चेंगराचेंगरी प्रकरणी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी), इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी डीएनए आणि कर्नाटक क्रिकेट असोसिएशनविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक सरकारने गुरुवारी उच्च न्यायालयात स्थितीदर्शक अहवाल सादर केला. आता या प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत केली जाणार आहे. तसेच विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात येईल, असे कर्नाटक सरकारने उच्च न्यायालयात स्पष्ट केले.

कार्यवाहक मुख्य न्यायाधीश व्ही. कामेश्वर राव आणि न्या. सी. एम. जोशी यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला अपघाताचा स्थिती अहवाल सादर करण्यास सांगितले. पुढील सुनावणी १० जून रोजी होईल. आरसीबीच्या खेळाडूंना सन्मानित करण्याचा निर्णय कोणी घेतला, हे राज्य सरकारने स्पष्ट करावे. देशासाठी न खेळणा-या खेळाडूंचा सन्मान करण्याची काय गरज होती? असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी गुरुवारी उच्च न्यायालयात केला. तब्बल १८ वर्षांनंतर आयपीएलचे जेतेपद पटकावल्यानंतर विजयोत्सव करताना झालेल्या चेंगराचेंगरीत मृत झालेल्या ११ जणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत आरसीबीने जाहीर केली आहे. तसेच मृतांच्या कुटुंबियांना मदत करता यावी म्हणून 'आरसीबी केअर्स' नावाचा मदतनिधी देखील उभारला जात आहे. आरसीबीच्या विजयोत्सवात चेंगराचेंगरी प्रकरणी बीसीसीआय आणि आयपीएल प्रशासनाने हात झटकले आहेत.

आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल म्हणाले, चेंगराचेंगरीची घटना कळताच आम्ही ताबडतोब आयोजकांना कार्यक्रम लवकर संपवण्याची विनंती केली. या घटनेला बीसीसीआय जबाबदार नाही. ही खरोखरच अतिशय दु:खद घटना असून आम्ही मनापासून शोक व्यक्त करतो. बीसीसीआयसाठी आयपीएल अंतिम सामन्यानंतरच संपुष्टात आले. आम्हाला अशा कोणत्याही घटनेची कोणतीही माहिती नव्हती. मग त्यासाठी आम्हाला कसे जबाबदार धरता येईल? चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर घडलेली चेंगराचेंगरी हा केवळ एक अपघात नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेच्या अपयशाचे लक्षण आहे. मृत्युमुखी पडलेल्या परिवारामध्ये एका १३ वर्षांच्या चिमुरड्या मुलीचाही समावेश आहे. हे सारे पाहताना खूप वेदना होतात. या घटनेने आपल्याला एक मोठा धडा दिला आहे. कोणतीही भावना ही विवेकशून्य झाल्यास, ती विनाश घडवू शकते. उत्साह असावा पण त्याचबरोबर शहाणपणही असावे. कारण ज्या चिन्नास्वामी स्टेडियमची प्रेक्षक क्षमता ३५ हजार आहे तिथे जर दीड-दोन लाख लोक जमा होत असतील तर प्रशासन व सुरक्षा यंत्रणा काही करू शकत नाही. आपणही निरपराध नाही.

'संधी चुकवायची नाही' या मानसिकतेमुळे शिस्त मोडली जाते. अफवा, गोंधळ, ढकलाढकली हे सगळं चक्र आपणच सुरू करत असतो. सामान्य माणूसही संयम बाळगू शकत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मुळात, अशा गर्दीत जायची काय गरज होती? चेंगराचेंगरी होऊ शकते हे माहीत असताना लोक गर्दीत घुसतात ही आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल. आपला जीव ही आपलीच जबाबदारी असते. गेलेले प्राण परत मिळत नाहीत. त्यामुळे अशा दुर्दैवी घटनेनंतर आगामी काळात तरी सर्वसामान्य लोक त्यापासून काही बोध घेतील ही अपेक्षा. व्याधी, दु:ख, मरण या घटना मानवाधीन नसल्या तरी विवेकबुद्धीचा वापर करणे नक्कीच मानवाधीन आहे. विजयी संघाचे स्वागत झाले पाहिजे यात वाद नाही पण आनंद साजरा करण्यासाठी आपले 'असणे' महत्त्वाचे आहे. आनंदाचा उत्सव साजरा करताना समोर दिसणारे संकट ओळखून उत्साहाला काबूत ठेवले तर आपल्या मौल्यवान जीवाचे रक्षण होईल. विजयोत्सव साजरा करताना चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू होणे ही घटना अत्यंत क्लेशदायक आहे. मुळात आयपीएलमध्ये खेळणारे संघ त्या-त्या राज्याचे प्रतिनिधित्व करतात का? कारण आयपीएलमध्ये संघमालक आपली आर्थिक गुंतवणूक करतात, विविध देशांचे खेळाडू लिलावात विकत घेतात. त्यांचा आयपीएलच्या माध्यमातून नफा कमावणे हा उद्देश असतो. खेळाडूंना जरी आर्थिक लाभ होत असला तरी अंतिमत: मालामाल हा संघमालकच होत असतो. क्रिकेट कसोटी मालिका, विश्वकप, टी-२० चषक स्पर्धेत खेळताना खेळाडू आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामध्ये मिळालेल्या विजयाचा आनंद क्रिकेटप्रेमींसाठी नव्हे तर देशासाठीही अभिमानाचा क्षण असतो. या उलट आयपीएलकडे फक्त मनोरंजन म्हणून चाहते पाहतात. म्हणून आयपीएलमध्ये होणा-या आर्थिक उलाढालीकडे चाहत्यांनी डोळसपणे पाहण्याची गरज आहे. तसेच विजयोत्सव साजरा करताना चाहत्यांनी संयम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. तसे झाले तरच अशा अप्रिय घटनांना पायबंद बसू शकेल. अशा दुर्घटनेमुळे गर्दीचे व्यवस्थापन करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा ती आपत्ती ठरू शकते. धार्मिक, राजकीय, सामाजिक कारणांमुळे गर्दीची निर्मिती होते. सण-उत्सव, जत्रा ही सुद्धा गर्दीची ठिकाणे आहेत. गर्दीला शिस्त नसते त्यामुळे गोंधळ होतो. लोकांच्या उत्साहाचा अतिरेक होतो तेव्हा परिस्थिती बिकट बनते. मुंबई शहराने विजयोत्सवाच्या अनेक घटना पाहिल्या आहेत, तुफान गर्दीचा अनुभव घेतला आहे. परंतु या गर्दीने कधीही अप्रिय घटनेचे गालबोट लागू दिले नाही. मुंबई पोलिसांनी आधीपासूनच केलेले नियोजन महत्त्वाचे ठरले. पोलिस, इतर अधिकारी, क्रिकेट बोर्ड आणि टीम मॅनेजमेंटच्या समन्वयाने सारे काही सुरळीत पार पडले. मुंबई पोलिसांनी बंगळुरूपेक्षा दहापट जास्त गर्दी हाताळली परंतु एकही दुर्घटना घडू दिली नाही. २०२४ मध्ये टी-२० विश्वकप विजेत्या भारतीय संघाचा विजयोत्सव साजरा झाला तेव्हा मुंबई पोलिसांचा चोख बंदोबस्त कौतुकास्पद होता. भारतीय संघानेसुद्धा पोलिसांचे आभार मानले होते.

# अनिलदादा अभूतपूर्व अभिष्टचिंतन सोहळा

## ऋणानुबंध: रांगोळीतून साकारले अनिलदादांचे प्रतिबिंब

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी जिल्हाभरातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मंडळींनी एकत्रित येऊन अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा केला. अनिलदादा जगताप यांनी सर्व शिवसैनिकांना बॅनरबाजी नको, गरजवंतांना मदतीचा हात द्या असे अहवान केले होते. काल दि. ४ जून रोजी अनिलदादांच्या अहवानाला प्रतिसाद देत शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी मिळून विविध ठिकाणी वृक्षारोपण, अन्नदान, अनाथ आश्रमात किराणा वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रेनकोट वाटप, गोरगरीब महिलांना साड्या वाटप तसेच रक्तदान शिबीर अशी विविध सामाजिक उपक्रम राबवत अनिलदादा जगताप यांचे अभिष्टचिंतन केले. तसेच बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सायं ५.०० वाजल्यापासून ते उशिरा रात्रीपर्यंत बीड जिल्ह्यासह बाहेरच्या जिल्ह्यातून देखील अनिलदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मित्रपरिवार मोठ्या संख्येने येत होता.







### लाडक्या बहिणींकडून औक्षण

अनिलदादा जगताप यांच्या निवासस्थानी असंख्य महिला-भगिनींनी एकत्रित येऊन पंचवन्न दिव्यांनी अनिलदादांचे औक्षण केले. विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांनी अनिलदादा यांचा वाढदिवस साजरा होत असताना महिला-भगिनींनी अनिलदादांचे पंचवन्न दिव्यांनी केलेले औक्षण अभिष्टचिंतन सोहळ्यातील एक भावनिक क्षण ठरला.

### अनिलदादांचे अनोखे अभिष्टचिंतन!

बीडमधील कलाकारांनी एकत्रित येऊन रांगोळीच्या विविध रंगातून अनिलदादा जगताप यांची हुबेहूब प्रतिमा साकारत अनिलदादांचं अनोखे अभिष्टचिंतन केले. अनिलदादांच्या वाढदिवसाच्या दिनी बीडमधील सुप्रसिद्ध रांगोळीकार अंजलीताई खोबरे यांनी अनिलदादा जगताप यांची साकारलेली रांगोळी वाढदिवसाचे मुख्य आकर्षण ठरले.

# खमक्या अन् निडर कार्यकर्ता लागला निवडणूक तयारीला!

## भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कलचे चित्र बदलणारः विलास शिंदेंची संघर्षशील कार्यकर्ता म्हणून ओळख

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्ह्याची जनता नेहमीच संघर्षशील कार्यकर्त्याला, मताचे पाठबळ देत आलेली असून तशी अनेक उदाहरणे देता येतील. त्याच अनुषंगाने धारूर तालुक्यातील भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कलमध्ये सामाजिक चळवळीतील खमक्या आणि संघर्षशी कार्यकर्ता विलास शिंदे निवडणूक रिंगणात उभा राहणार आहे. त्यामुळे यंदा भोगलवाडी सर्कलचे चित्र नक्कीच वेगळे राहणार असून सामान्य कुटुंबातील विलास शिंदे यांना मतदार बांधव जिल्हा परिषद सभागृहात घेऊन जातील असा ठाम विश्वास जनतेला आहे.

चिखली येथील विलास शिंदे, गेल्या अनेक वर्षांपासून माजलगाव मतदार संघातील सर्व समाजाचे प्रश्न शासन दरबारी मांडत आलेले आहेत. एक अतिशय प्रेमळ आणि सृजनशील नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कलमध्ये विलास शिंदे यांनी दौरा काढून ग्रामस्थांच्या, सामान्य जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या अडीअडचणी व त्यांचे प्रश्न जाणून घेतले आहेत.

भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कलमध्ये म्हणावा तेवढा विकास झालेला नाही. आजही अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. या सर्कलमधून निवडून जाणारे व्यक्ती सभागृहात आवाज उठवत नाहीत. त्यामुळे जनतेचे आणि विकासाचे प्रश्न मार्गी लागत नाहीत. भोगलवाडी सर्कलमध्ये दौरा केल्यानंतर एक बाब आपल्या लक्षात आली की, आजपर्यंत निवडून गेलेल्या सदस्यांनी या सर्कलचा विकास करण्याकरिता आपली भूमिका प्रमाणिकपणे पार पाडली नाही. त्यामुळे भोगलवाडी सर्कल विकासापासून कोसोदूर आहे. समाजकारण आणि राजकारण करत असताना नेता नेहमीच सामान्य जनतेला उपलब्ध असला पाहिजे. जो नेता सामान्य जनतेला उपलब्ध नाही, असा नेता त्यांचे प्रश्न कसा सोडवू शकेल. परंतु आपण विद्यार्थी दशेपासून समाजाच्या विविध मुद्द्यांवर सतत मोर्चे, आंदोलने, निदर्शने करत आलो आहोत. त्यामुळे भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कलमध्ये ते नवीन नाहीत.येथील लोकांची आणि त्यांची नाळ जोडलेली आहे. म्हणून हीच बाब विलास शिंदे यांच्यासाठी अतिशय जमेची बाजू आहे.



### जनतेने ठरविले तर काहीही होऊ शकते

कोणताही लढा यशस्वी करण्यासाठी अथवा निवडणूक जिंकण्यासाठी जनतेची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. कारण जनतेने ठरविले तर अशक्य गोष्ट देखील शक्य होते. त्यामुळेच येत्या निवडणूकीत भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कलमधून एक सामान्य कुटुंबातील व्यक्ती विलास शिंदे निवडणूक रिंगणात उभा राहतो आहे. सर्कलमधील मतदार जनतेने ठरविले तर विलास शिंदे यांना जिल्हा परिषद सदस्य पदाची निश्चितच संधी मिळेल अशा लोकभावना मतदार बांधवातून व्यक्त होत आहेत.

# बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात अतिक्रमण; पुराचा धोका वाढतोय

## लाखो रुपये खर्च करून एका बाजूने स्वच्छतेवर जोर

बीड/प्रतिनिधी

एकीकडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या पुढाकाराने आणि आमदार संदीप क्षीरसागर, सामाजिक संघटनेच्या निधीच्या पाठबळावर बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीची स्वच्छता मोहीम जोमात सुरू असतानाच, दुसरीकडे नदीपात्रात आणि काठावर रोजच कचऱ्याचे नवे ढीग तयार होत आहेत. हे सगळे प्रयत्न पाण्यात जात असल्याचे चित्र आहे. कचऱ्याचे थर, अतिक्रमणांची मालिका आणि प्रशासनाच्या कारवाईतील ढिसाळपणा यामुळे बिंदुसरा नदीच्या पर्यावरणावर मोठा आघात झाला आहे. परिणामी, शहरवासीयांच्या डोक्यावर दरवर्षी पुराचा संभाव्य धोका कायम आहे. त्यातच आता पुररेषेत मोठमोठे बांधकाम सुरू आहेत.

बिंदुसरा नदीची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नदी स्वच्छतेचे काम हातात घेतले. त्यांच्या पुढाकाराला आमदार क्षीरसागरांनी निधी उपलब्ध करून दिला. तहसीलदार चंद्रकांत शेळके, सामाजिक संघटना या स्वच्छता मोहिमेत हातभार लावत आहेत, तर नगरपालिका प्रत्यक्षात नदीपात्रात कचऱ्याचे ढीग, झाडझुडूप, अतिक्रमण आणि पूररेषेतील अनधिकृत बांधकामे याकडे दुर्लक्ष करत आहे.

जिल्ह्यातील नेते, मंत्री आणि अधिकारी तरी जागे होणार का? मॉन्सूनच्या पार्श्वभूमीवरच जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत पूररेषेतील अतिक्रमण हटवण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रत्यक्षात आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने बीडकरांमध्ये नाराजी आहे. पालकमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आता तरी ठोस भूमिका घ्यावी आणि बिंदुसरा नदी अतिक्रमणमुक्त करून पर्यावरणाचा बचाव करावा.

-डॉ. गणेश ढवळे

नुसती मोहीम नको, ठोस निर्णय घेणे गरजेचे बिंदुसरा नदीच नव्हे तर शहरातील कर्परा नदी आणि इतर ओढ्यांवर देखील मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे आहेत. अनेकदा मोजणी झाली पण कारवाई होत नाही. खरेतर नदी, ओढे अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यायला हवा, मात्र सामाजिक कार्यकर्त्यांनी यासाठी पुढे आल्यानंतरही प्रशासन हलत नाही.

-रामनाथ खोड

# जिल्हा सहकार बोर्डाच्या अध्यक्षपदी रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी सुहास पाटील

बीड/प्रतिनिधी

जिल्हा सहकार बोर्डाच्या कार्यालयात दि. ४ जून रोजी नवनिर्वाचित संचालक मंडळांची सभा पार पडली. यावेळी बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या अध्यक्षपदी सहकार महर्षी मा रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक मा सुहास पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री.ए टी सानप साहेब यांनी काम पाहिले. त्यांना बीड जिल्हा सहकार अधिकारी श्री आर.डी. वाघमारे साहेब यांनी सहाय्य केले.

बीड जिल्हा सहकार बोर्ड लि.बीड च्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली. नवनिर्वाचित संचालका मधून अध्यक्ष ,उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली .या सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा कार्यकाळ २०२५ ते २०३० असा राहणार आहे. निवडीनंतर सर्व संचालकांनी अध्यक्ष ,उपाध्यक्ष यांचे अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ज्येष्ठ संचालिका धडाडीच्या नेत्या सुशिलाताई मोराळे, ज्येष्ठ मा.संचालक मा कल्याण काका आखाडे, मा कैलास माने, मा पठाण नसीर खाँ दौलत खाँ, मा भगवान पाखरे, मा महादेव तोंडे, मा अश्रुबा आंधळे, राज्य सहकारी संघाच्या माजी संचालक सौ .संगीता पोकळे, मा अच्युत शिंदे, सौ. तारामती बांगर, सौ.किसकिंदा जाधव, मा किशोर राऊत, मा बाबासाहेब नागरगोजे , मा भुजंगराव आंधळे या नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करण्यात आला. सहकारी कायद्याचे शिक्षण, प्रशिक्षण व प्रसिद्धी या संचालक मंडळाच्या वतीने बीड जिल्ह्यामध्ये चांगल्या प्रकारे करण्यात येईल. असे मत यावेळी चेअरमन रामकृष्ण बांगर यांनी व्यक्त केले. लवकरच जालना रोडवर सहकार बोर्डाच्या स्वतंत्र इमारतीसाठी जागा घेण्याचेही यावेळी चेअरमन बांगर यांनी सांगितले. राज्य सहकारी संघातर्फे बीड जिल्हा बोर्डाच्या कार्यक्रमासाठी स्वतंत्र निधी देण्यात येणार असल्याचेही चेअरमन रामकृष्ण बांगर यांनी सांगितले. श्री बांगर सध्या राज्य सहकारी संघावरही संचालक म्हणून काम पाहत आहेत. नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालक मंडळाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



पान एक वरून

**बीडमध्ये उभारणार सहकार**

व इतर सहकारी संस्थांच्या क्षेत्रीय कार्यालयांना आता एकाच छताखाली आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बीडमध्ये सध्या जिल्हा उपनिबंधक कार्यालय हे जालना रोडवरील सहकार शक्ती इमारतीत भाडेतत्त्वावर कार्यरत आहे. यासाठी मोठा शासकीय निधी वार्षिक भाड्यापोटी खर्ची पडतो. हा अनावश्यक खर्च टाळण्यासाठी आणि कार्यप्रणाली अधिक सुसुत्र करण्यासाठी सर्व सहकारी कार्यालये एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या सहकार संकुलामुळे शासकीय खर्च वाचणार असून नागरिकांसाठी एकाच ठिकाणी सेवा उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, अनेक वर्षांपासूनचा सहकार संकुलाचा प्रश्न मार्गी लागला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

**नगरला भारत जिंदाबाद**

भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात आली या वेळी जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे शहर जिल्हाध्यक्ष, विजय भांबळ, जिल्हा सरचिटणीस, संजय कांबळे जिल्हा नेते, गणेश कदम शिवाजीराव साळवे राजा जगताप कविता नेटके माया जाधव बंटी अमित काळे बाळासाहेब नेटके बापू जावळे गायकवाड अविनाश घोडके पत्रकार काळू ससाने शितल घोडके रोहित कांबळे निखिल सूर्यवंशी योगेश घोडके पप्पू जगताप उत्कर्ष भालेराव आदर्श साळवे यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पावसाळ्यापूर्वी स्वच्छतेचे**

पावसानेच रस्त्यावर पाणी येते आणि गोरगरिबांच्या घरात शिरते . साचलेल्या पाण्यामुळे बीडचे चिखलबीड होऊन जाते . १५ जूनला शाळा सुरू होत आहेत . त्यामुळे पावसाळ्याआधीच शहर स्वच्छ झाले तरच पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल आणि शहराचे चिखलबीड होण्यापासून वाचवता येईल तसेच नगरपालिका प्रशासनाने नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कामगाराचा आढावा घेतलेला आहे काय ? पावसाची चाहूल लागण्याआधीच ही कामे पूर्ण झाली पाहिजेत. तेव्हा लवकरात -लवकर नगरपालिका प्रशासनाने नालेसफाईची आणि स्वच्छतेचे कामे पूर्ण करावीत आणि नागरिकांच्या घरात पाणी गेल्यास नगर परिषद प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसंग्रामचे शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी नगर पालिका प्रशासनाला केली आहे .

**केजमध्ये पहलगाम घटनेचा**

शेषराव घोरपडे,शेख चांदपाशा शेख गुलाब, सतीश बनसोडे, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**दिवाळीपूर्वी घरकुलांचे टार्गेट**

नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन लाख घरकुलांच्या चाव्या वाटप केल्या होत्या. गरीबांच्या व्यथा नरेंद्र मोदींना समजतात. त्यामुळेच देशात घरकुल योजना प्रभावीपणे राबवली जाते आहे.बीड जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबवली जात आहे.आज आपण देशात घरकुल योजनेच्या बाबतीत दहाव्या क्रमांकावर आहोत आणि विभागीय पातळीवर प्रथम स्थानी आहोत ही बाब अभिमानास्पद आहे, पण अजून मोठ्या प्रमाणावर काम पूर्ण करायचं आहे.दारिद्र्य ही सर्वात मोठी पीडा आहे. स्वतःचं हक्काचं घर ही जीवनात खुप मोठी बाब आहे. यासाठी गावपातळीवर घरकुल टार्गेट पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.सरपंच व ग्रामसेवक यांनी लाभार्थ्यांची आडवणूक करू नये. चुकीच्या पद्धतीने बीलं काढू नका. दिवाळीपूर्वी घरकुल योजनेचं उद्दिष्ट पूर्ण करा. दिवाळीपूर्वी घरकुलाची चावी लाभार्थ्यांना द्या असेही पंकजाताई यांनी सांगितले.

**बीडमध्ये वंचितकडून**

व अकोला पॅटर्नच्या यशस्वी अनुभवांची मांडणी केली जाणार आहे.या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी अजय सरवदे, प्रमुख मार्गदर्शक भास्कर भोजने, तर विशेष उपस्थिती प्रा. किसन चव्हाण व प्रा.विष्णू जाधव यांची राहणार आहे.या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी, बीड शहराचे नेते मिलिंद सरपते यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, प्रकाश आंबेडकर हे केवळ राजकारणी नाहीत तर सामाजिक परिवर्तनाचा खंबीर आवाज आहेत. आज त्यांच्या भूमिकेला समजून घेणे ही काळाची गरज आहे. समाजातील तरुण, कार्यकर्ते, विचारवंत यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हा आणि सत्य विचारांशी नातं जोडा.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## कर्तबगार व्यक्तींना मानद डॉक्टरेट प्रदान

**कल्याण :** विविध क्षेत्रातील वाखाणण्याजोगी कामगिरी केल्याबद्दल युनिव्हर्सिटी ऑफ कोलंबोच्या वतीने भारतातील काही कर्तबगार व्यक्तींना मानद डॉक्टरेट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डोंबिवलीतील प्रसिद्ध व्यावसायिक तसेच नामांकित खर्डीकर क्लासेसचे संस्थापक डॉ.सुनील खर्डीकर यांच्या पाच निकटवर्तीयांची यामध्ये निवड झाली असून त्या पाचही जणांना आळंदी देवाची पुणे येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे दिलीप घणघाव, संगीता खर्डीकर, वैद्यकीय क्षेत्रात अग्रेसर असलेल्या सुषमा शिंदे, जितेंद्र कदम तसेच कायदे क्षेत्रातील ॲड. गणेश मुकणे यांना युनिव्हर्सिटी ऑफ कोलंबोच्या वतीने मानद डॉक्टरेट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत डॉ.सुनील खर्डीकर हे देखील उपस्थित होते. खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून आम्ही एकत्रितपणे काम करीत असून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अधिकाधिक गरजवंतांची मदत करण्यासाठी आमचा नेहमीच पुढाकार असतो. माझ्या सहकाऱ्यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या आजवरच्या कामाची पोचपावती आहे. यापुढेही आमचे कार्य असेच सुरू राहील अशा भावना यावेळी डॉ. सुनील खर्डीकर यांनी व्यक्त केल्या.

# ओवळा-माजिवड्यातील विकासकामे १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करावी

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले यंत्रणांना निर्देश

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणे महापालिका क्षेत्रात ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांपैकी बहुतांश कामे प्रगतिपथावर असून त्यांचे उद्घाटन १५ ऑगस्टपर्यंत करण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी नियोजन करावे, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामे व शासनाकडील मंजूर निधी खर्च करणे, एमएमआरडीएच्या माध्यमातून होणाऱ्या रस्त्यांचा आढावा घेणे आणि घोडबंदर येथील रस्त्यांची कामे आदी विषयाबाबत आढावा बैठकीचे आयोजन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे महापालिका मुख्यालयात कै. अरविंद पेंडसे सभागृह येथे गुरूवारी करण्यात आले होते. या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव,



अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, एमएमआरडीएचे संचालक (प्रकल्प) अनिल साळुंखे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता विनय सुर्वे यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

घोडबंदर रोड आणि परिसरात सुरू असलेल्या सर्व कामांमुळे येत्या काही महिन्यात या भागाचे चित्र आणखी बदललेले दिसणार आहे. त्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय साधून कामे मार्गी लावावीत, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. तसेच, पावसाळ्यात पाणी साठू नये, घोडबंदर भागातील गावांना पावसाच्या पाण्याचा त्रास होऊ नये यासाठी, सर्व यंत्रणांनी सतर्क रहावे. त्यादृष्टीने, महापालिकेने या भागात २२ कल्व्हर्टची साफसफाई केली आहे. त्यात, चार कल्व्हर्ट पूर्णपणे बुजलेले होते, तेही साफ करण्यात आले आहेत. त्याचा पावसाळ्यात निश्चितपणे फायदा होईल, असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. गायमुख घाटातील रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादनाचा अभ्यास आतापासूनच करावा, अशी सूचनाही त्यांनी केली. तर, एमएमआरडीएमार्फत १९ रस्त्यांची कामे करण्यात येत आहेत. त्यातील रस्त्यांचे सर्वेक्षण झाले असून २ रस्त्यांची कामे सुरू झाली आहेत. एकूण भूसंपादनापैकी ४६ टक्के भूसंपादन बाकी असून त्यास महापालिका प्राधान्य देईल, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या बैठकीत स्पष्ट केले. तसेच, १५ ऑगस्टपर्यंत उद्घाटन करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी तयारी करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले.

### कामगार नेत्यांची पालिका आयुक्तांकडे मागणी

## 'परिवहन उपक्रमाच्या बसेसचे स्ट्रक्चरल ऑडिट करा'



◆ नवी मुंबई (वार्ताहर) :

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसची तपासणी अथवा स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची लेखी मागणी कामगार नेते व महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रवींद्र सावंत यांनी निवेदनातून महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या तब्बल ७ बसेसच्या जळीतकांडाच्या घटना घडल्या आहेत. रस्त्यावर धावणाऱ्या बसेसमध्ये आग लागणे ही चिंताजनक बाब आहे. यामुळे परिवहन उपक्रमाचे वाहक-चालक तसेच प्रवाशांच्या जिवितास धोका निर्माण होऊ शकतो. मोठी दुर्घटना होण्याची भीती आहे. या घटनांमुळे प्रवासी परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून प्रवास करणे टाळतील. मुळात परिवहनच्या बसेसमध्ये हजारो नवी मुंबईकरांची दररोज प्रवासी वाहतूक होत असल्याने त्या बसेस सुस्थितीत असणे आवश्यक आहे अथवा बसेस जळीत घटनांमुळे महापालिका प्रशासनाची प्रदेश पातळीवर प्रतिमा मलीन होऊन बसेसला मृत्यूचा सापळा म्हणून प्रवाशांकडून संबोधले जाईल. बस जळीतकांडाच्या घटना गंभीर बाब असून प्रशासनाने याची दखल घेणे आवश्यक असल्याचे रविंद्र सावंत यांनी निवेदनात म्हटले आहे.

महापालिका परिवहन उपक्रमाकडून नादुरुस्त बसेस चालविल्या जात असून त्यामुळे अपघातही झाले आहेत. अनेक बसेस गळक्या असल्याचे व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. नादुरुस्त बसेसमुळे अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? अपघातग्रस्त चालक व वाहक कर्मचाऱ्यांच्या परिवाराचे पालनपोषण कोण करणार? त्यामुळे सर्वप्रथम नादुरुस्त बसेस रस्त्यावर आणण्याचे प्रकार बंद करणे आवश्यक आहे. परिवहन उपक्रमाच्या कार्यरत असलेल्या सर्वच बसेसची तपासणी अथवा स्ट्रक्चरल ऑडिट होणेआवश्यक आहे. महापालिका सधन असून पालिका प्रशासनाला आवश्यकता असल्यास नवीन बसेसची खरेदी प्रशासन करु शकते. आपण तातडीने परिवहन उपक्रमाच्या सर्वच बसेसचे स्ट्रक्चर ऑडिट करण्याचे व बस तपासण्याचे संबंधितांना निर्देश द्यावेत. बस जळीत कांडाच्या घटना पुन्हा होणार नाहीत याबाबत आपण परिवहन उपक्रमला आदेश द्यावेत. बस जळीत घटना घडून काही दुर्घटना घडल्यास परिवहन व्यवस्थापकांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा रवींद्र सावंत यांनी महापालिका आयुक्तांना दिला आहे.

## वेचक

### अशोक कुळकर्णी यांना मातृशोक

**ठाणे :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिवसैनिक अशोक कुळकर्णी यांच्या मातोश्री श्रीमती शीला पांडुरंग कुळकर्णी (वय ८४) यांचे



वृद्धापकाळाने ठाण्यातील बेथनी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. श्रीमती कुळकर्णी यांनी आपल्या कुटुंबाचा उत्तम सांभाळ करताना नात्यांची वीण घट्ट केली. त्यांचेच संस्कार त्यांचे सुपुत्र अशोक कुळकर्णी यांच्यावरही झाले. अशोक कुळकर्णी हे दिवंगत धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे एकनिष्ठ अनुयायी असून गेली दोन दशके ग्रामीण भागातील गरजूंसाठी कार्यरत आहेत. शीला पांडुरंग कुळकर्णी यांच्या निधनाने एक संस्कारी, प्रेमळ, सेवाभावी व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

### व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग तपासणी



**ठाणे :** असंसर्गजन्य व्याधीमध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन ठाणे जिल्हा आरोग्य विभागाने महापालिका क्षेत्रात संपूर्ण मे महिना कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनमार्फत नागरिकांची मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग तपासणी केली. यावेळी एकूण चार हजार ५०० नागरिकांची तपासणी करण्यात आली, यामध्ये १.२ टक्के मौखिक कर्करोग, २ टक्के स्तन तर १.६ गर्भाशयमुख कर्करोग लक्षणे नागरिकांमध्ये आढळली असून, यापैकी मौखिक कर्करोगाच्या बायोप्सीसाठी ३८ नमुने पाठवले आहेत. आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महापालिका, मीरा भाईंदर, भिवंडी, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर नवीमुंबई या महापालिका बरोबर अंबरनाथ बदलापूर नगरपालिका क्षेत्रात महिनाभरात एकूण चार हजार ५०० नागरिकांची कर्करोग तपासणी करण्यात आली असल्याची माहिती दंत शल्य चिकित्सक डॉ. अर्चना पवार यांनी दिली.

### 'एक विद्यार्थी, एक झाड' संकल्पना राबवा

**कल्याण :** पर्यावरणाचा बचाव करण्यासाठी, प्रदूषण कमी करण्यासाठी, जलसंवर्धनासाठी तसेच कचरा वर्गीकरणासाठी नागरिकांनी देखील पुढाकार घेऊन सहकार्य करावे असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कल्याणमधील उंबर्डे अमृत प्रकल्प येथे वृक्षारोपण करताना त्यांनी हे प्रतिपादन केले. याचवेळी त्यांनी उंबर्डे येथील घनकचरा प्रकल्प येथे मीयावाकी पद्धतीने वृक्षारोपण करण्याचा शुभारंभ केला,महापालिका परीक्षेत्रात अन्य सहा ठिकाणी देखील अशी मियावाकी जंगले तयार केली जातील अशी माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली. आज देशी प्रजातीच्या सुमारे ३००० झाडांची आपण लागवड केली आहे, यापुढे लोकसहभागातून वृक्षारोपण केले जाईल,त्याचप्रमाणे 'एक विद्यार्थी एक झाड' ही संकल्पना- ही ॲक्टिव्हिटी दर महिन्यात राबविण्यात येईल अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच शासनाच्या निर्देशानुसार प्लास्टिक मुक्त शहर हे अभियानही सर्वांच्या वतीने राबवायचे आहे, असे आवाहन आयुक्तांनी यावेळी केले.



## कै. अण्णा कूर्मा चौधरी यांचे पुण्यस्मरण

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

कै. अण्णा कूर्मा चौधरी यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त पवन चौधरी, सौरभ चौधरी, विकी चौधरी आणि एम्पेरर्स ग्रुप यांच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. गेल्या सहा वर्षांपासून हे उपक्रम नियमितपणे राबवले जात असून यंदाचे हे सातवे वर्ष होते. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात सुमारे ४० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमातून गरजू



रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण मदत मिळाली आहे. शाळकरी विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्यांचे वाटप देखील करण्यात आले. यामध्ये सुमारे ४५० ते ५०० विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वितरण करण्यात आले, जे विद्यार्थ्यांसाठी मोठा आधार ठरले. मोफत नेत्र तपासणी शिबिराला देखील नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. समाजाच्या हितासाठी अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात यावे, अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. यावेळी माजी नगरसेवक जनार्दन म्हात्रे, ऐड. प्रदीप बावस्कर, मनसे पदाधिकारी संदीप म्हात्रे, अजय शेट्टी अतुल अंबरे, प्रेम पाटील, अनिल पाटिल, रूपेश पाटिल, माजी नगरसेवक सोपान पाटिल, अंकित जाधव, आकाश शिंदे, अभी पाटील, किशन चौरसिया, सूरज शिंदे, आकाश पत्रों, रोहित शिंदे आणि मित्र परीवार उपस्थित होते.

## नवी मुंबईत सिडकोतर्फे वृक्षारोपण



◆ नवी मुंबई (वार्ताहर) :

सिडकोतर्फे जागतिक पर्यारवण दिनानिमित्त सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील रायगड भवन समोरील मैदानावर वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत करंजा वृक्षाच्या रोपांची लागवड करण्यात आली. "सिडकोने नवी मुंबईत विविध प्रकल्प साकारत असताना पर्यावरणाचा नेहमीच समतोल राखला आहे. नवी मुंबई वसवताना सिडकोने शाश्वत विकासावर भर दिला आहे. यापुढेदेखील एका निरोगी व उज्जवल भविष्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखून विकासकामे करण्यास सिडको कटिबद्ध आहे."असे विजय सिंघल यांनी सांगितले. या प्रसंगी डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, सुरेश मेंगडे, यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढीव कचरा शुल्क प्रकरणी जनआक्रोश मोर्चा

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

केडीएमसीने घनकचऱ्यावरील वाढीव कर रद्द करावा या मागणीसाठी मनसेच्या वतीने केडीएमसी मुख्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. केडीएमसीतील घनकचरा व्यवस्थापन विभागाने कुठलीही पूर्वसूचना न देता नागरिकांच्या माथी वाढीव कर मारला आहे. घरगुती कचरा उचलण्यासाठी आधी ६०० रुपये घेतले जात होते. यामध्ये ३०० रुपयांनी वाढ करून ९०० रुपये करण्यात आले आहेत. तसेच व्यवसायिक आस्थापनांसाठी आधी ७२० रुपये घेतले जात होते. यामध्ये ७०० रुपयांनी वाढ करून १४२० रुपये इतका केला आहे. नागरिकांना कुठल्याही प्रकारची सूचना न देता परस्पर कर वाढ करून नागरिकांची



लूटमार केली जात आहे. याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेने मार्फत तीव्र 'जनआक्रोश मोर्चा' महापालिकेच्या विरोधात काढण्यात येईल अशा आशायाचे पत्र मनसेच्या वतीने केडीएमसी आयुक्तांना २३ मे २०२५ रोजी दिले होते. तरी प्रशासनाने दखल न घेतल्याने मनसेच्या वतीने आज कल्याण पश्चिमेतील मोहिंदर काबल सिंग शाळे पासून केडीएमसी मुख्यालयावर धडक आक्रोश मोर्चा मनसेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांच्या नेतृत्वाखाली काढीत आयुक्तांची भेट घेतली. तसेच पूर्वीच्या साफसफाई ठेकेदाराला प्रतिमाह ३ कोटी देण्यात येत होते. आता सुमित एल्को कंपनीस ९ कोटी प्रतिमाह हे कसे? या ठेकेदाराने पहिले शहराची साफसफाई व्यवस्थित करावी, प्रशासनाने जनतेला स्मार्ट सिटीची दिव्या स्वप्ने दाखवू नयेत. प्रत्यक्ष कृती करावी असे प्रसिद्धी माध्यमांना कल्याण जिल्हा अध्यक्ष मनसे उल्हास भोईर यांनी सांगितले.

### क्रिशा देवरे नाखवा परितोषिकांची मानकरी

**ठाणे :** शतायुषी सेवाभावी आनंद भारती समाज, ठाणेतर्फे यंदाच्या ११५ व्या गणेशोत्सवात शालांत परीक्षेत गुणानुक्रमे ठाणे केंद्रात सर्वप्रथम येणाऱ्या उमेदवाराचा नाखवा परितोषिकांनी गौरव करण्यात येणार आहे. कोपरीच्या माँ बाल निकेतन विद्यालयाची विद्यार्थीनी क्रिशा मनिषा विजय देवरे हिने ५००पैकी ४८८ गुण (९९.००%) संपादन केले आहेत. ती ७४ व्या कै यशवंत लक्ष्मण नाखवा स्मारक पारितोषिक व ३९ व्या कै विष्णू पांडू नाखवा परितोषिकांची मानकरी ठरली आहे, अशी माहिती संस्थेचे कार्यवाह संदीप कोळी यांनी दिली. क्रिशाला भविष्यात कोअर कॉम्प्युटर सायन्स इंजिनियरिंगला जायचे आहे. या यशाबद्दल आनंद भारती समाजाचे अध्यक्ष हरेश्वर मोरेकर यांनी क्रिशाचे अभिनंदन केले.

## वृक्षदिंडी, वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

◆ मीरा-भाईंदर (वार्ताहर) :

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मीरा-भाईंदर महानगरपालिका उद्यान विभागाच्या वतीने 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत वृक्षारोपण व वृक्षदिंडी हा कार्यक्रम आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा. प्र.से.) यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. कै. अरविंद पेंडसे उद्यान, मिरा रोड (पूर्व) येथून आरक्षण क्र. २४२ पर्यंत वृक्षदिंडी काढण्यात आली. या वृक्षदिंडीच्या माध्यमातून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व, त्यांचे संवर्धन व संगोपन करण्याची गरज याबाबत जनजागृती करण्यात आली.

यानंतर अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह ते आरक्षण क्र. २४२ या मार्गावर महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, माजी नगरसेवक व



नागरिकांच्या सहभागातून सामूहिक वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करताना नागरिकांनी झाडे लावण्यासोबतच त्यांचे पालनपोषण व देखभाल करण्याचे आवाहन यावेळी मा. आयुक्त यांनी केले. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी 'घरोघरी नर्सरी' या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येक नागरिकाने आपल्या घरी, गच्चीवर, बाल्कनीत किंवा उपलब्ध जागेत छोट्या प्रमाणात झाडांची रोपे तयार करावीत, असे आवाहन केले. यावेळी आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले की, पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे आणि अशा उपक्रमांमुळे सामाजिक जाणिवेतून मोठा बदल घडवता येतो.

### पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये कल्याणच्या खेळाडूंची सरशी

**कल्याण :** नुकत्याच पालघर येथे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांनी आयोजित केलेल्या ५१ व्या महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये कल्याण येथील कारभारी जिमच्या तीन खेळाडूंनी विशेष कामगिरी केली. यामध्ये मिलिंद खळदकर यांनी मास्टर २ (५९ किलो वजन) गटात सुवर्णपदक प्राप्त केले. गौरव सुतार याने सब ज्युनिअर (५९ किलो वजन) गटात रौप्य पदक तसेच वरुण गायकर याने ज्युनियर (१०५ किलो वजन) गटात कास्यपदक प्राप्त केले. या खेळाडूंपैकी गौरव सुतार याची दावणगिरी कर्नाटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना कारभारी जिमचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विनायक कारभारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने महापालिका तत्कालीन आयुक्तांची चौकशी

◆ भाईंदर (वार्ताहर) :

बस खरेदी, होर्डिंग, कंत्राटे, नव्या इमारतींना परवानगी, कर्मचाऱ्यांच्या बढत्या व बदल्या बेकायदा पद्धतीने करून त्यात कोट्यवधींचा गैरव्यवहार करण्यात आल्याचा आरोप आमदारांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केला. आमदारांनी केलेल्या या आरोपाची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार विभागाकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेत दिलीप ढोले आयुक्त तसेच अतिरिक्त आयुक्त असताना बस खरेदी, होर्डिंग, कंत्राटे अनेक नव्या इमारतींना परवानगी, कर्मचाऱ्यांच्या बढत्या व बदल्या बेकायदा पद्धतीने करण्यात आल्या. ढोले यांनी तत्कालीन उपायुक्त मारुती गायकवाड, रवी पवार, नगर रचनाकार हेमंत ठाकूर यांच्याशी संगनमत करून ही कामे बेकायदा पद्धतीने केली, त्यात कोट्यवधींचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे आरोप करत, त्यांच्या चौकशीची मागणी आमदार नरेंद्र मेहता यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती.

त्याची दखल घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार तत्कालीन आयुक्त दिलीप ढोले यांच्यासह इतर तीन अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### उद्यानांत कांचन, बहावा, जांभूळ, आंबा, बकुळसह रक्तचंदनाचीही लागवड

# जागतिक पर्यावरण दिनी भिवंडीत ८०० वृक्षारोपण

◆ भिवंडी (वार्ताहर) :

पर्यावरणाच्या दृष्टीने शासन धोरणानुसार मान्सून काळात २०२५-२६ मध्ये जास्तीत जास्त झाडे लावणे धोरणानुसार जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उद्यान/वृक्षप्राधिकरण विभागामार्फत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ कार्यक्षेत्रातील नव्याने विकसीत होणाऱ्या उद्यानांत मा. अति-आयुक्त विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते तसेच इमरान वली मोह खान, माजी उपमहापौर, भिवंडी



मनपा उपआयुक्त बाळकृष्ण क्षिरसागर, सहायक आयुक्त शैलेश दोंदे, सहाय्यक आयुक्त, नितीन पाटील, सहाय्यक आयुक्त अजित महाडीक, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ मकसुम शेख, वसिम शेख, उपअभियंता, फैजल तातली, आरोग्य विभाग, श्रीकांत परदेशी, जनसंपर्क अधिकारी, भिवंडी मनपा व परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, आगाज महिला बचत गटाच्या महिला व मनपाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थित वृक्षरोपणांचा शुभारंभ कार्यक्रम करण्यात आला. सदर कार्यक्रमांतर्गत प्रभाग समिती क्र. १ कार्यक्षेत्रातील उद्यानांत कांचन, बहावा, जांभुळ, आंबा, बकुळ, रक्तचंदन इ. २०० वृक्षरोपांची लागवड करण्यात आली आहे. तसेच मनपाच्या प्रभाग क्र. २ कार्यक्षेत्रातील भादवड स्मशानभूमी आवरात २०० बांबू वृक्षरोपांची लागवड करण्यात आली आहे. प्रभाग समिती क्र. 3 कार्यक्षेत्रात वऱ्हाळा तलाव उद्यान परिसरामध्ये १००झाडांची वृक्षरोपण करण्यात आलेली आहे. तसेच प्रभाग समिती क्र. ४ कार्यालयासमोर उपलब्ध जागी १०० स्थानिक प्रजातीच्या झाडांचे वृक्षरोपण करण्यात आलेले आहे. मनपाच्या दिवानशहा दर्गा तलाव परिसरात २०० झाडे लावण्यात आली आहेत. अशा प्रकारे महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण- ८०० वृक्षरोपण करण्यात आले असून, त्यांचे जतन व संवर्धन करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मा. अति- आयुक्त विठ्ठल डाके यांनी कार्यक्रमस्थळी केले.



ठाण्यात पावसाने जोर धरल्यामुळे विटावा ब्रिजखाली रिक्षा, टू व्हीलर बंद पडल्या. ट्राफिक पोलिसांना या गाड्या काढताना कसरत करावी लागली. (छाया : अशोक घाग)

# विजयाच्या जल्लोषावर बंगळूरूमध्ये शोककळा

आयपीएलमधील रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु (आरसीबी)च्या विजयाचा जल्लोष साजरा करत असतानाच बंगळूरुमध्ये एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. विजयी मिरवणुकीवर विरजण पडले. बंगळूरुमधील चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या आरसीबीच्या विजय मिरवणुकीपूर्वी अचानक झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांना जीव गमवावा लागला. तब्बल १८ वर्षांनंतर आरसीबीने आयपीएल ट्रॉफी जिंकल्याचा आनंद साजरा करण्यासाठी हजारो लोक स्टेडियममध्ये जमले असताना हा अपघात झाला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, गर्दी अचानक स्टेडियमच्या बाहेर आणि आत अनियंत्रित झाली, ज्यामुळे गोंधळ उडाला. या चेंगराचेंगरीच्या घटनेमागे आयोजकांचा निष्काळजीपणा आणि गर्दी नियंत्रणातील अनेक त्रुटी दिसून आल्या आहेत. आयपीएल २०२५च्या अंतिम सामन्यात आरसीबीने पंजाब किंग्जचा ६ धावांनी पराभव करून पहिल्यांदाच जेतेपद पटकावले.

'ई साल कप नाम नाम्दू' हे कन्नड भाषेतील घोषवाक्य या विजयानंतर देशभर पोहोचले. यंदाचा कप बंगळूरु जिंकणार असा त्याचा मराठी अर्थ आहे. क्रिकेटमधल्या एका महत्त्वपूर्ण विजयानंतर कन्नडसारख्या प्रादेशिक भाषेतील शब्द, वाक्य हे एका रात्रीत प्रसिद्ध होते, याचा अर्थ आयपीएलमधील विजयाचा आनंद प्रादेशिक अस्मिता वाढविण्यासाठी मदत करतो, हे या प्रकरणावरून अधोरेखित झाले.

आयपीएल २०२५ जिंकल्यानंतर, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु (आरसीबी) संघ बुधवारी बंगळूरुला पोहोचला तेव्हा विमानतळाबाहेर हजारो चाहत्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना भेटण्यासाठी जेव्हा संघ विधानसभेत रवाना झाला तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे असलेले चाहते टाळ्या वाजवत आणि संघाच्या बाजूने घोषणा देत होते. खुल्या बसमधील परेड रद्द केल्यावरही चाहत्यांनी खेळाडूंच्या बस मार्गावर दुतर्फा गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. मुख्यमंत्र्यांना भेटल्यानंतर, एम चिन्नास्वामी स्टेडियमवर संघाची विजयी मिरवणूक आयोजित करण्यात आली होती. ३५ हजार प्रेक्षक क्षमता असलेल्या स्टेडियमबाहेर चाहत्यांनी लाखोंच्या संख्येन गर्दी केली होती. पण इथेच चेंगराचेंगरीची घटना घडली. यावेळी कर्नाटक पोलिसांनी गर्दी पांगवण्यासाठी आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी काही ठिकाणी सौम्य लाठीचार्ज केला. मात्र, या लाठीचार्जमुळे परिस्थिती सुधारण्याऐवजी ती आणखी बिघडली. अचानकपणे झालेल्या या प्रकारामुळे चाहत्यांमध्ये गोंधळ उडाला, लोक सैरावैरा धावू लागले आणि यात चेंगराचेंगरी झाली. क्षणात आनंदाचे वातावरण गंभीर दुःखात बदलले. उत्सवाचा क्षण हा अकल्पनीय दुर्घटनेत रूपांतरित झाला. बंगळूरुच्या घटनेतील सर्व पीडित कुटुंबीयांसोबत माझ्या संवेदना आहेत. पीडित कुटुंबीयांना दुःखातून सावरण्याचे बळ मिळो, अशा भावना मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने सोशल मीडियावरून व्यक्त केल्या. क्रिकेटवीर युवराज सिंगसह आरसीबीचा स्टार विराट कोहलीसह अनिल कुंबळे आणि अन्य दिग्गज क्रिकेटर्सनी या घटनेनंतर एक्स पोस्टतून दुःख व्यक्त केले आहे.

अभिनेता शाहरूख खान याची के. के. आर, अभिनेत्री प्रीती झिंटाची पंजाब या बॉलिवुडच्या कलाकारांच्या टीम आयपीएलमध्ये खेळतात. तसेच नीता अंबानी, काव्या मारण या महिला उद्योजिकांच्या टीमने स्पर्धेत नशीब अजमावले होते. त्यामुळे 'खेळ आणि मनोरंजन यांचा संगम' आपल्याला आयपीएलमध्ये पाहायला मिळतो. आयपीएल सारख्या क्रिकेट स्पर्धांच्या आयोजनातून क्रिकेट कंट्रोल बोर्डाला सर्वांत श्रीमंत मंडळ बनवण्यात मोठी मदत झाली आहे. प्रसारणाचे हक्क, प्रायोजकत्व अशा वेगवेगळ्या मार्गांनी यंदाच्या आयपीएलमध्ये सुमारे १४ हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. आयपीएलची 'ब्रँड व्हॅल्यू' सुमारे १२ अब्ज डॉलरचा अंदाज असल्याने या स्पर्धेचा दबदबा लक्षात येतो. गेले अडीच महिने चाललेल्या आयपीएल सामन्यांची चर्चा रेल्वे प्रवासात ऐकायला मिळाली. दूरचित्रवाणीबरोबरच मोबाइल फोनवर या सामन्यांचा आनंद घेणाऱ्यांची संख्याही लक्षणीय होती. यंदा सुमारे ७५ कोटी प्रेक्षक आणि पाच हजार कोटी मिनिटांचा 'वॉच टाइम' या आकड्यांतून स्पर्धेच्या लोकप्रियतेची किर्ती होती, याचे वर्णन करता येईल.

यापूर्वी टी-२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर मुंबईत भारतीय संघाच्या स्वागतासाठी गर्दी उसळली होती. मुंबई पोलीस अधिकाऱ्यांसह अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला होता. त्या वेळी काही दुर्घटना घडली नाही, हे सुदैव. भारताने वर्ल्ड कप जिंकल्यानंतरही यापूर्वी मुंबई शहरात मिरवणूक झाली होती. मुंबई विमानतळ ते वानखेडे स्टेडियम या परिसरात ज्या शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणूक निघाली होती, त्याचे कौतुक झाले होते. लोकप्रिय चित्रपट तारे-तारकांना पाहण्यासाठी जमलेल्या गर्दीमुळे घडलेल्या दुर्घटनाही ताज्या आहेत. अतिरेकी क्रिकेटप्रेमात बेशिस्तीची भर आणि अपुऱ्या पडणाऱ्या यंत्रणा यामुळे बंगळूरुवासीयांच्या आनंदाच्या क्षणांना दुर्घटनेचे गालबोट लागले.

देशात वारंवार घडणाऱ्या या दुर्घटनांबाबत सरकारी यंत्रणा आणि सुज्ञ नागरिकांनीही गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे, हे नक्की. कुंभमेळ्यात चेंगराचेंगरीत किती बळी गेले याची तुलना बंगळूरु येथील चेंगराचेंगरीशी करून, कर्नाटकातील सत्ताधारी काँग्रेस पक्षांने हात झटकण्याचा प्रयत्न केला असला तरी, विजयोत्सवासाठी किती गर्दी होणार याचा अंदाज प्रशासनातील अधिकाऱ्यांना व्हायला हवा होता. तेथील पोलीस प्रशासनाने ऑन लाईन पास देण्याची व्यवस्था केली होती; परंतु किती जणांना पासेस वितरीत करण्यात आले, त्याठिकाणी किती जागा आहे, याचा विचार पोलीस प्रशासनाने केलेला दिसला नाही; परंतु तसे घडले नाही. त्यामुळे बॅरेकेट तोडून काही जण आत घुसण्याचा प्रयत्न करत होते. बंगळूरु येथे घडलेल्या दुर्घटनेतून धडा घेऊन जमणाऱ्या बेफाम गर्दीला आवर कसा घालावा, यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्याची आता वेळ आली आहे.

## राशिभविष्य

शुक्रवार दि. ६ जून २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती ज्येष्ठ शुद्ध एकादशी शके १९४७, चंद्र नक्षत्र हस्त ०६.३३ पर्यंत नंतर चित्रा चंद्र राशी कन्या. शुक्रवार दिनांक ६ जून २०२५, सूर्योदय ६.००, सूर्यास्त ७.१४, चंद्रोदय ३.०९, चंद्रास्त २.५५ उद्याची राहू काळ १०.५७ ते १२.३७, निर्जला स्मार्त एकादशी, शिवराज्याभिषेक सोहोळा, किल्ले रायगड, शुभ दिवस-सकाळी- १०.१२ ते दुपारी-०३.३१.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : चांगली सुरुवात होईल.

**वृषभ** : कामाचा ताण जाणवणार आहे.

**मिथुन** : गोड बोलण्याचा फायदा होणार

**कर्क** : योग्य व्यक्तीचा सल्ला घ्या.

**सिंह** : संधी प्राप्त होणार आहे.

**कन्या** : कामामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

**तूळ** : व्यवसायामध्ये आघाडी घ्याल.

**वृश्चिक** : मन शांत ठेवूनच काम करा.

**धनू** : विद्यार्थ्यांना दिवस चांगला.

**मकर** : मोठे निर्णय घ्यावे लागतील.

**कुंभ** : नोकरीमध्ये सामान्य स्थिती राहील.

**मीन** : आर्थिक आवक मनासारखी होईल.

# हरित भविष्याला सामर्थ्यवान करताना...

**प्रल्हाद जोशी**
**केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारताने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात केवळ महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे निश्चित केली नाहीत तर निर्धार, नवोन्मेष आणि अतुलनीय प्रमाणावर ती साध्य केली आहेत.

भारत आज जगातील आघाडीच्या स्वच्छ ऊर्जा नेतृत्वांपैकी एक असून सौरऊर्जेच्या क्षेत्रात भारताचा तृतीय क्रमांक आहे, पवनऊर्जेत चौथा तर एकूण नवीकरणीय ऊर्जा क्षमतेतही भारत चौथ्या क्रमांकावर आहे. सुमारे २३२ गिगावॅट स्थापित नवीकरणीय ऊर्जेसह आणखी सुमारे १७६ गिगावॅट क्षमता निर्माणाधीन असताना आपण आपली ऊर्जेची गरज पूर्ण करण्याबरोबरच ऊर्जा संक्रमणावरील जागतिक परिदृश्याला सक्रियपणे आकार देत आहोत. ही प्रगती म्हणजे योगायोग नसून धाडसी सुधारणा, वेळेवर घेतलेले निर्णय आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत एका स्पष्ट दीर्घकालीन दृष्टिकोनाचा सातत्याने केलेला पाठपुरावा याचे हे फलित आहे.



नवीकरणीय ऊर्जाक्षेत्रात एक चैतन्यशील परिसंस्था उभारण्याविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट आहे. २०१४ मध्ये पंतप्रधानपदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर त्यांनी या योजनेला राष्ट्रव्यापी स्वरूप दिले. याचेच फलित म्हणून भारत आज सौर, पवन आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील नवोपक्रमात जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. गेल्या वर्षभरातच, आपण राष्ट्रीय ग्रीडमध्ये विक्रमी २९ गिगावॅट नवीकरणीय ऊर्जा जोडली आहे. देशात २०१४ मध्ये सौरऊर्जेची क्षमता केवळ २.६३ गिगावॅट होती, ती २०२५ मध्ये आश्चर्यकारकपणे ४१ पटींनी वाढून १०८ गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे. पवन ऊर्जा क्षमता देखील ५१ गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे. अशाप्रकारे देशाच्या चहुबाजूंनी पसरलेल्या या प्रकल्पांना आता एकात्मिक पारेषण प्रणालीद्वारे एकत्र जोडले जात आहेत, ज्यामुळे 'एक राष्ट्र एक ग्रिड'चे स्वप्न साकार होत आहे. मात्र या परिवर्तनाच्या व्याप्तीचे कौतुक करण्यासाठी आपण आरंभ कुठून केला हे लक्षात घेतले पाहिजे. वर्ष २०१४ मध्ये भारताचे ऊर्जाक्षेत्र अत्यंत वाईट परिस्थितीतून जात होते. ऊर्जेची कमतरता हा यक्षप्रश्न होता. २०१२ मध्ये झालेल्या दुहेरी ग्रीड बिघाडामुळे, प्रथम उत्तर प्रदेशचा ३६,००० मेगावॅट वीज भार कमी झाला आणि त्यानंतर ४८,००० मेगावॅट वीज प्रभावित करणारे उत्तर, पूर्व आणि ईशान्य ग्रीड कोसळले, ही घटना अजूनही आपल्या आठवणीत ताजी आहे. ही परिस्थिती अतिशय निर्णायकपणे पालटली. भारताने ऊर्जा कमतरतेकडून ऊर्जा आत्मनिर्भरतेकडे झेप घेतली. मागे पडणाऱ्या स्थितीतून आपण एक आदर्श नेतृत्व म्हणून स्थित्यंतर केले आहे. प्रथम, फीड-इन टॅरिफपासून पारदर्शक, बाजारपेठवर केंद्रित बोली प्रक्रियेकडे होणारे स्थलांतर हा एक महत्त्वाचा क्षण होता. येथे मी मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या काळात नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात केलेल्या ११ परिवर्तनकारी सुधारणा अधोरेखित करत आहे. स्पर्धात्मक बोली आणि दर सुसूत्रीकरण यांमुळे २०१० मध्ये असलेले प्रति युनिट सौरऊर्जेचे दर १०.९५ रुपयांवरून २०२१ पर्यंत आश्चर्यकारकपणे १.९९ रुपयांपर्यंत घसरले आणि यामुळे सौरऊर्जेच्या किमतीत भारत जागतिक नेतृत्व करण्याच्या स्थानी पोहोचला. या सुधारणेमुळे गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करता आला आणि जीवाश्म इंधनांसह किंमत समानता स्थापित केली गेली.

दुसरे म्हणजे, आंतर-राज्य पारेषण प्रणाली (ISTS) शुल्क माफ करणे हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. हे शुल्क रद्द करून सरकारने प्रकल्प विकासकांसमोर असलेला एक मोठा अडथळा दूर केला.

तिसरे म्हणजे आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी सरकारने सौर ऊर्जा निमिर्तीसाठी २४,००० कोटी रुपयांची उत्पादनावर आधारित प्रोत्साहन योजना अर्थात पीएलआय योजना सुरू केली. यामुळे देशांतर्गत ऊर्जा निर्मितीला मोठी चालना मिळाली आणि २०१४ मधील सौर मॉड्यूल उत्पादन क्षमता २.३ गिगावॅटवरून ८८ गिगावॅट आणि २०२५ पर्यंत सेल क्षमता संदर्भात ० ते २५ गिगावॅटपर्यंत पोहोचले. भारत आता फक्त सौरऊर्जा वापरत नाहीये, तर तो निर्मितीही करत आहे.

सरकारने मान्यताप्राप्त मॉडेल्स आणि उत्पादक (एएलएमएम) आदेश, घटक आणि उत्पादकांची मंजूर यादी तसेच घरगुती सामग्री आवश्यकता यांची अंमलबजावणी केली. या चौथ्या सुधारणेमुळे भारतीय उत्पादकांसाठी योग्य आणि समान संधी प्राप्त झाल्या तसेच आत्मनिर्भर आणि स्पर्धात्मक सौर परिसंस्थेचा मार्ग खुला झाला.

पाचवे म्हणजे पंतप्रधानांच्या दूरदृष्टीनुसार प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना अर्थात मोफत वीज योजना एक परिवर्तनकारी उपक्रम ठरली आहे ज्यामध्ये एक कोटी घरांमध्ये ३० गिगावॅट विकेंद्रित क्षमता निर्माण करण्यासाठी छतावरील सौरऊर्जा - रूफटॉप सोलर बसवण्याचे लक्ष्य आहे. सहावी सुधारणा अर्थात पीएम-कुसुम योजनेअंतर्गत कृषिक्षेत्राला सौरऊर्जा प्राप्त होत असून शेतकऱ्यांना विकेंद्रित सौर यंत्रणा उभारण्यासाठी सहाय्य केले जात आहे. सातवे, भारत आता स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात जगाचे अनुकरण करत नाही तर जगाचे नेतृत्व करत आहे. २०१४ मधील थेट परकीय गुंतवणुकीच्या अत्यल्प प्रमाणावरून एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२४ या काळात भारताने १९.९८ अब्ज अमेरिकी डॉलर्स इतकी थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली. या प्रवासातील कायापालट करणारा आणखी एक घटक म्हणजे राष्ट्रीय हरित हायड्रोजन अभियान. या अभियानासाठी २०,००० कोटी रुपयांची तरतूद केली असून भारताला स्वच्छ इंधन क्षेत्रात एक जागतिक केंद्र बनवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

आठवे अर्थात पारेषण पायाभूत सुविधा या स्थित्यंतरातील कणा ठरला आहे. हरित ऊर्जा कॉरिडॉर्समधील भारताची गुंतवणूक आणि २०३० चा पारेषण आराखडा पाहता नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प ग्रीडशी परिणामकारकपणे आणि विश्वासार्हपणे जोडले जातील याची खात्री आहे.

नवव्या सुधारणेविषयी सांगायचे म्हणजे सरकार भारताच्या विस्तीर्ण किनारी भागाच्या अफाट क्षमतेचा देखील विचार करत आहे. ऑफशोअर पवन ऊर्जा उपक्रमांसाठी २०३० पर्यंत ३७ गिगावॅट क्षमतेच्या निविदांची योजना विचाराधीन असून त्यांना व्यवहार्यता अंतर निधी आणि सुव्यवस्थित सर्वेक्षणांद्वारे सहाय्य केले जाणार आहे.

दहाव्या सुधारणेअंतर्गत वारंवार येणारी आव्हाने लक्षात घेऊन, भारताने अत्यंत निर्णायक पाऊल टाकून हायब्रिड आणि २४ तास चालू राहणारे वीज धोरण अवलंबले आहे. पवन-सौर मिश्र आणि फर्म अँड डिस्पॅचेबल रिन्यूएबल एनर्जीला प्रोत्साहन देऊन, भारत २४/७ अखंड आणि स्वच्छ ऊर्जा पुरवठ्यासाठी उपाय तयार करत आहे. अकरावी सुधारणा म्हणजे ज्या ठिकाणी आतापर्यंत कधीच वीज पोहोचली नव्हती अशा आदिवासी आणि दुर्गम भागातील कुटुंबांपर्यंत आम्ही पोहोचत आहोत.

### जागतिक मान्यता आणि देशांतर्गत संकल्प

भारत केवळ देशातच प्रगती करत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या आंतरराष्ट्रीय सौर आघाडीने १०० हून अधिक राष्ट्रांना एकत्र आणले आहे. सौर ऊर्जा जगाला कशाप्रकारे एका छताखाली आणू शकते हे 'एक सूर्य, एक जग, एक ग्रीड' ही संकल्पना जगाला दाखवून देत आहे. भारतात मुख्यालय असलेली ही पहिली आंतरराष्ट्रीय आणि आंतर-सरकारी संघटना आहे. अलीकडेच २४ मे २०२५ रोजी झालेल्या नीती आयोगाच्या नियामक परिषदेच्या बैठकीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात रोजगार निर्मिती करण्यासंदर्भात सर्व मुख्यमंत्र्यांशी विस्तृत चर्चा केली.

### पुढील वाटचाल

पंतप्रधान मोदी यांनी २०३० पर्यंत ५०० गिगावॅट बिगर-जीवाश्म इंधन वीज निर्मितीचे ध्येय ठेवले आहे. सध्या आपण २२८ गिगावॅट निर्मितीचे लक्ष्य पूर्ण केले असून १७६ गिगावॅट निर्मितीचे कार्य निर्माणाधीन आहे, तर ७२ गिगावॅट प्रकल्प निविदा प्रक्रियेत आहेत. आपण आता अगदी योग्य मार्गावर आहोत. यामुळे आपली वाढती ऊर्जेची गरज करण्यासाठी आपण सक्षम होऊ शिवाय २०३२ पर्यंत दुप्पट होणाऱ्या आपल्या विजेच्या मागणीसाठीही तरतूद होईल. एकत्रितपणे हे सर्व महत्त्वपूर्ण टप्पे स्वच्छ आणि सर्वसमावेशक प्रगतीच्या जोरावर विकसित भारत निर्मितीच्या वचनबद्धतेचा कणा आहेत. नवभारतावर सूर्य तेजाने तळपत आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण जगाचे नेतृत्व करायला सिद्ध आहोत.

# वाया गेलेल्या औषधांची विल्हेवाट



**ममता आठल्ये**
**मुंबई ग्राहक पंचायत**

दरवर्षी ५ जून रोजी एक संकल्पना घेऊन जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. यावर्षीची थीम आहे. 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत'. जरी प्लास्टिक, प्रदूषणास जबाबदार असणारा प्रमुख घटक असला तरी प्लास्टिकच्या बरोबरीने औषधे सुद्धा प्रदूषणास घातक ठरत आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढलेले आजार त्याचबरोबर माफक किमती, सहज उपलब्धता यामुळे आज चॉकलेट गोळ्यांसारखा औषधांचा वापर होतो आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. आपल्याकडे कालावधी संपलेली आणि न वापरलेली औषधे घरगुती कचऱ्यात फेकून तर कधी फ्लश करून त्यांची विल्हेवाट लावली केली जाते. अशा बेजबाबदार कृतीमुळे सक्रिय रासायनिक घटकपदार्थ भूजल आणि अन्न साखळीमध्ये प्रवेश करतात. माती, पाणी आणि अन्न यांच्या प्रदूषणाबरोबरच ही औषधे प्राण्यांच्या पोटात जाऊन त्यांच्या जीवाला धोका उद्भवतो. काही वर्षांपूर्वी मानवी मृतदेहातील मांस भक्षण करणारी गिधाडे मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडली होती. मीमांसा करताना असे लक्षात आले की, 'डाक्लोफेनाक सोडियम' या दर्द निवारक रासायनिक घटकाचे मृत देहातील अंश पोटात गेल्याने गिधाडे मरण पावत आहेत.

जागतिक स्तरावरील दुसरी भीषण समस्या म्हणजे प्रतिजैविकांना उत्पन्न होत असलेला प्रतिरोध. प्रामुख्याने उदाहरण द्यायचे झाले तर प्रचलित औषधांना निष्प्रभ करणारे क्षयरोगाचे जीवाणू. काही वेळा कालावधी संपलेल्या औषधांचा गैरवापर अथवा पुनर्विक्री होते. त्यामुळे ती प्राणघातक ठरू शकतात. या पार्श्वभूमीवर केरळ राज्याने फेब्रुवारी महिन्यात राज्याच्या आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांच्या हस्ते आपल्या देशातील पहिला 'n PROUD' म्हणजेच 'New Program on Removal of Unused Drugs' प्रकल्प कोझिकोडे शहरात कार्यान्वित करण्याचे ठरवले आहे. या प्रकल्पांतर्गत न वापरलेली व मुदतबाह्य औषधे गोळा करून त्यांची सुरक्षित आणि योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार आहे. यासाठी निळ्या रंगाचे कंटेनर कायमस्वरूपी शहरातील विविध ठिकाणी संकलनासाठी ठेवण्यात येणार आहेत. तसेच या कामी सेवाभावी व पर्यावरणासाठी पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संस्थांना देखील सहभागी करून घेतले जाणार आहे. अगदी थेट घराघरातून सुद्धा ठरावीक दिवशी असे संकलन केले जाणार आहे.




औषधे ही जैववैद्यकीय कचरा प्रवर्गात मोडत असल्याने त्यांच्या विल्हेवाटीसाठी जैववैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९६ लागू होतो. या नियमांनुसार

१. पिवळ्या रंगाच्या बॉक्सेस किंवा क्लोरीनमुक्त प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये न वापरलेल्या व मुदतबाह्य औषधांचे विल्हेवाटीसाठी संकलन केले जाते.

२. उत्पादक किंवा विक्रेत्याला ही संकलित केलेली औषधे विल्हेवाटीसाठी परत दिली जातात

३. प्रथम औषधांचे वेष्टन कापून ती पावडर स्वरूपात इन्सिनरेटरमध्ये जाळून टाकली जातात. कचऱ्यावर प्रक्रिया आणि त्याचे व्यवस्थापन करणाऱ्या युनिटला केंद्र व राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाची परवानगी असणे बंधनकारक आहे.

४. जमिनीत पुरून औषधांची विल्हेवाट लावणे ही सुद्धा एक सर्वसामान्य पद्धत आहे.

रुग्णालये, सरकारी व खासगी दवाखाने, प्रयोगशाळा, मेडिकल दुकाने, संशोधन करणाऱ्या संस्था यांमधील जैववैद्यकीय कचऱ्याची हाताळणी वरील पद्धतीने केली जाते. आजार बरा होणे, औषधांचा कालावधी पूर्ण होणे, उपचार पद्धतीमध्ये बदल, स्ट्रीप साईज, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय विकत घेता येणारी OTC औषधे अशा विविध कारणांमुळे आपल्या घरामध्ये न वापरलेली औषधे ही जमा होतच असतात. आपण घरामध्ये औषधांची साठवणूक करताना झाकण असलेला एक वेगळा बॉक्स सुरक्षित ठिकाणी ठेवावा. दर सहा महिन्यांनी बॉक्समधील औषधांची तपासणी करून त्यातील मुदतबाह्य औषधे तसेच पुनर्वापर करण्याची शक्यता नसलेली प्रिस्क्रिप्शनवरील औषधे वेगळी काढावी. आपल्या घराजवळील केमिस्ट किंवा एखादी संस्था अशी औषधे घेतात का याची माहिती काढावी. अन्यथा ती कापून, लेबल काढून एका पिशवीत घालून कचऱ्यात टाकावी.


आज औषधे ही आरोग्य सेवेवर होणाऱ्या खर्चाचा एक प्रमुख हिस्सा आहेत. आपल्याकडे वापरली न गेलेली व अंतिम तारीख न उलटलेली औषधे वापरण्यासाठी योग्य धोरणाचा अभाव आहे. प्रिस्क्रिप्शनवर मिळणारी पण न वापरलेली औषधे पुनर्वापरासाठी औषध कंपन्यांना परत पाठविण्यासाठी राष्ट्रीय धोरणात्मक मार्गाची गरज आहे. अमेरिकेत अशी प्रणाली कार्यरत आहे.

भारत औषध उत्पादनात जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. औषध उद्योगाची उलाढाल १.३ ट्रिलियन एवढी प्रचंड आहे. पण वर्षाला २७० कोटी रुपयांची औषधे मुदतबाह्य झाल्यामुळे फेकून दिली जातात. प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात एकीकडे गोरगरिबांना औषधे विकत घेणे परवडत नाही तर दुसरीकडे कोट्यवधी रुपयांची औषधे पाण्यात जात आहेत.

केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना ही राष्ट्रीय नियामक प्राधिकरण आहे. तिच्याद्वारे कालबाह्य व न वापरलेली औषधे यांचा गैरवापर व प्रतिजैविके प्रतिरोध होऊ नये म्हणून त्यांची शास्त्रशुद्धरीत्या विल्हेवाट लावण्यासाठी मार्गदर्शक धोरणे आखणीचे काम चालू आहे. लवकरच त्याची पूर्तता होऊन राष्ट्रीय धोरण अमलात येणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या काही स्वयंसेवी संस्थांनी या कामात पुढाकार घेतला आहे. यातील एक उल्लेखनीय संस्था म्हणजे R निसर्ग फौंडेशन जी ठाणे शहरात कार्यरत आहे. ग्रीन फार्मसी या उपक्रमाद्वारे त्यांनी ठाणे शहरात विविध ठिकाणी (गृहनिर्माण संस्था, मेडिकल दुकाने, मॉल्स) औषध संकलनासाठी बॉक्स ठेवले आहेत. जमा झालेल्या औषधांचे वेष्टन काढून त्यांची पावडर करून ती जाळून टाकण्यासाठी पाठविली जाते. वर्तमानपत्रात हल्लीच आलेल्या बातमीनुसार मुंबई महानगरपालिकेने घातक कचऱ्याचे संकलन करून विल्हेवाट लावण्याची सेवा १ मेपासून सुरू केली आहे. मुंबईत दररोज सात हजार ते आठ हजार मेट्रिक टन कचरा निर्माण होतो. त्यामध्ये सुमारे ७० ते ८० टन वैयक्तिक स्वच्छतेशी संबंधित कचऱ्याचा म्हणजेच सॅनेटरी पॅड्स, डायपर्स, कालबाह्य औषधे, शरीर पुसण्यासाठी वापरलेले दूषित कापूस, बँडेजेस, शृंगार केंद्रांमध्ये निर्माण कचरा (वॅक्सिन्ग स्ट्रिप्स, पीपीई) आदींचा समावेश होतो. हा अत्यंत घातक कचरा असला तरी अनेक वेळा त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि सामान्य घरगुती कचऱ्यातच तो टाकला जातो. त्यामुळे कचरा संकलित करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. त्यावर प्रक्रिया करणे अवघड होते. मुंबईतील विविध गृहनिर्माण संस्था, निवासी संकुले, शृंगार केंद्रे, महिला वसतिगृहे, शैक्षणिक संस्था अशा विविध आस्थापनांमधून नोंदणी तत्त्वावर असा कचरा निःशुल्क गोळा केला जाणार आहे. त्यासाठी दिलेल्या संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे.

हा कचरा प्लाझ्मा इन्सिनरेशन युनिट्समध्ये जाळण्यात येणार आहे. मुंबईकरांना घातक कचऱ्यामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो याबद्दल जनजागृतीची नितांत गरज आहे. महानगरपालिकेला त्यांच्या कचरागाड्यांवर काम करणाऱ्या व्यक्तींनासुद्धा प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. अन्यथा वेगळा करून दिलेला कचरा गाडीवरील कामगारच पुन्हा एकत्र करतात असा नागरिकांचा अनुभव आहे. घातक कचरा गोळा करण्यासाठी पिवळ्या रंगाच्या पिशवीचा वापर करायचा आहे. अधिकाधिक लोकांपर्यंत हा उपक्रम पोहोचविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जाणार आहे. आज औषध साक्षरता ही काळाची गरज आहे. नागरिकांना न वापरलेली व मुदतबाह्य औषधांची साठवणूक व विल्हेवाट याबद्दल शिक्षण व मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता आहे.

# जलामृत की विषामृत?



**डॉ. महालक्ष्मी वानखेडकर**

वायू सजीव सृष्टीसाठी प्राण आहे तसेच जल हे सुद्धा मुख्य तत्त्व आहे. संस्कृतमध्ये आप म्हणजे पाणी. वेदांमध्ये पाण्याला दिव्य म्हटले जाते. जे शांती, आनंद, संपत्ती, दीर्घायुष्य आणि चांगले आरोग्य आणते असे मानले जाते. औषधी गुण तत्त्वांमुळे त्याला 'अमृत' म्हणतात. आपल्या यजुर्वेदामध्ये सुद्धा जल हे सर्व रोगांवरचे औषध दिले आहे.

**"शुद्धा न आपस्तन्वे क्षरन्तु'।**

म्हणजे जलाची शुद्धता ही आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक आहे. पुराणानुसार पूजेचे साहित्य नद्यांमध्ये विसर्जन करणे, अस्थी विसर्जन करणे, पाण्यात थुंकणे, मूत्रविसर्जित करणे... हे सर्व जलाचा अपमान आणि पाप करण्यामध्ये येते. वैदिक परंपरेनुसार जलसंवर्धन करणे फार आवश्यक आहे. जल हे प्रत्येकाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. परमेश्वराने या सजीव सृष्टीसाठी पालक म्हणून परिपूर्ण व्यवस्था केली आहे. पंचतत्त्वाव्यतिरिक्त वृक्ष-वनसंपत्ती सर्व काही दिले आहे. या अद्भुत शक्तीने आपल्यासाठी हे अमृतमय जल स्रोत नद्या, सागर, तलाव, झरे यातून सर्व घटकांपर्यंत पोहोचवले आहे. ऋतुचक्र योग्यरीत्या चालते, तेथून आपल्याला जल हे पावसाच्या माध्यमातून मिळते.

युगानुयुगे मानवाच्या प्रवृत्तीत जसजसा बदल होत गेला तसतसे पर्यावरण कमकुवत होत चालले. सांडपाणी, औद्योगिक कचरा, शेतीतील रसायने, प्लास्टिक, तेल गळती अशी जलप्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. मूळ औद्योगिक क्रांतीमुळे आपण जल विषमय करत आहोत. जल प्रदूषण अनेक कारणांमुळे होते, ज्यात नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटक समाविष्ट आहेत.




जगात १,५०,००० पेक्षा जास्त नद्या आहेत. नाईल, ॲमेझॉन, मिसिसिपी, यांगत्झी सारख्या प्रमुख नद्या आहेत. भारतात जवळजवळ ४०० पेक्षा अधिक नद्या होत्या त्यातील प्रमुख १२ नद्या आहेत. यातील ब्रह्मपुत्र, गंगा, नर्मदा, सरस्वती, इंडस, ओहायो, मेघना, युना अशा अनेक नद्या आता आटल्या आहेत. या नद्या आटण्याचे मुख्य कारण म्हणजे धरणे आणि अनेक पर्यावरण हानिपूरक योजना. महाराष्ट्रातील ५५ नद्या या सर्वाधिक प्रदूषित असून भारतातील दिल्ली जवळील यमुना, पाकिस्तानातील रावी आणि इतर देशातील नैरोबी, थेम्स, पाझ, नायजर आणि नाईल, येलो, आर्टेमिस, अशा अनेक नद्या आहेत. प्रशांत, अटलांटिक, दक्षिणी, आर्कटिक, हिंद हे प्रमुख पाच महासागर आहेत. शिवाय अजून पन्नास समुद्र सुद्धा आहेत. आपण समुद्र सुद्धा प्रदूषित करत आहोत. प्लास्टिक, औद्योगिक नद्यांमधील कचरा समुद्रात सोडून दिल्यामुळे समुद्राच्या गुणवत्तेला नुकसान झाले आहे. ज्याचा परिणाम मानवी आणि जलचर आरोग्यावर होत आहे. जगामध्ये कचरा आणि सांडपाणी यामुळे सर्व नद्यातील परिसंस्थेचा नाश झाला आहे. नद्या, समुद्र या सर्वांचे जल हे प्रदूषित झाल्यामुळे पर्यावरणीयदृष्ट्या खालचे पात्र हे मृत झाले आहे म्हणजेच ऑक्सिजनची पातळी ही २० टक्क्यानी कमी झाली आहे. औद्योगिक क्रियाकलापांमुळे येथील जीव जीवाणूंसाठी असणारे पोषक घटक तत्त्व (सशक्त गाळ) विषारी झाल्यामुळे येथील जीवसृष्टी नामशेष होत चालली आहे. समुद्रातील ध्वनी उदाहरणार्थ तेल ड्रिलिंग, समुद्री परिवहन, समुद्रावर टाकण्यात येणारी प्रकाश योजना ज्यामुळे प्राकृतिक घटकांना त्यांच्या जीवनचर्येत बाधा उत्पन्न करत असून उष्णता वाढल्यामुळे येथील समुद्री जीवांना गंभीर नुकसान होत आहे. या जलप्रदूषणामुळे आमांश, अतिसार हेपेटाइटिस ए, कॉलरा, टायफॉइड, पोलिओ, प्रजनन संस्थेवर परिणाम, कर्करोग आणि घातक रासायनिक द्रव्यांमुळे शरीरातील इतर अवयवांवर होणारे परिणाम अशा अनेक गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

आता जगभरात साधारणतः २५% लोकसंख्येला सुद्धा पिण्याचे शुद्ध पाणी मिळू शकत नाही. पाण्याच्या शुद्धीकरणासाठी क्लोरीनचा वापर करावा लागतो पण महत्त्वाचे म्हणजे क्लोरीनमुळे जंतू मरतच नाही. WHO नुसार जगभरात कमीत कमी दोन अब्ज लोक हे प्रदूषित जल पितात, तर दिवसातून फक्त अतिसारामुळेच अंदाजे १००० मुलांचा तरी मृत्यू होतो. माझ्या मते या सजीव सृष्टीतील अनेक घटक या प्रदूषणामुळे नामशेष झाले आहेत, ज्याची आपण मोजणी करू शकतच नाही आणि मानवाची सुद्धा. १९७४ मध्ये "वॉटर ॲक्ट" स्थापित केला होता त्यानुसार अनेक मंडळांची स्थापना करून कडक कायदे जलप्रदूषण करणाऱ्यांवर आणि जल प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण यावर केले गेले. १९८८ मध्ये पर्यावरण संरक्षणासाठी यात अजून सुधारणा करण्यात आली. प्रदूषणामुळे सुरुवात तर ऋतुचक्र बदलाने झालीच आहे, पण भवितव्यात सजीव सृष्टीसाठी असणाऱ्या गरजाचं काय? बदलणारा निसर्ग आपल्याला सारखा सावध करतोय. भविष्यात सांगितल्याप्रमाणे तिसरे महायुद्ध झाल्यानंतर सुरुवात ही जल संकटाने होणार आहे. ऋतुचक्र-वनस्पती ते सर्व सजीव, निर्जीव घटक या सर्वांसाठी जल ही संजीवनी आहे; परंतु मानवाने त्याच्या क्रूर आणि घातकीपणामुळे या जलदेवतेला विषमय करून टाकले आणि ही संजीवनी मृत्यून्त झाली. चारही बाजूंनी समुद्राने घेरलेल्या मुंबईसारख्या बेटाला सुद्धा या जल प्रदूषणाचा फटका जोरदार बसणार आहे. कारण आपण पराकोटीचे प्रदूषण करत आहोतच; परंतु समुद्राला आत ढकलण्याचा जो काही विडा उचलला आहे त्यात एक दिवस हा समुद्र या बेटाला गिळंकृत करेल. निसर्गातील प्रत्येक घटक हा विचारपूर्वक आणि संतुलित केला गेला आहे. त्यात ढवळाढवळ केल्यास प्रकृती कधीही सहन करणार नाही. या मानवी क्रुरकर्मामुळे या सजीव सृष्टीतील एकही घटक जिवंत राहू शकणार नाही. कितीही प्रयत्न केला तरी अमृतमय जल विषमय होऊन जाईल आणि विष सुद्धा प्यायला मिळणार नाही !

आता तरी या परिपूर्ण मानव घटकाने तिच्या संरक्षणात्मक कार्य करावे म्हणजे जलसंतुलन होऊ शकते आणि तरच ही जलदेवता तुम्हाला म्हणजे सर्व सजीव सृष्टीला कायम सुखमय आणि आनंदमय ठेवू शकते.

dr.mahalaxmiwankhedkar@gmail.com

# ब्रह्मर्षी अंगिरस



आपल्या कौटुंबिक जीवनात जसे आपल्या आजोबांचे मानाचे, जिव्हाळ्याचे स्थान असते, तसेच आपल्या वैचारिक, बौद्धिक जीवनात ऋषींना स्थान आहे. ऋषी म्हणजेच ज्ञानाचा, पावित्र्याचा, साक्षात्कारी अनुभवांचा साठा होय, अशीच आपल्या मनात त्यांची प्रतिमा असते आणि ती खरीही आहे. एकेक ऋषी म्हणजे एकेक ज्ञानपीठ होय. या ऋषींकडे त्यांचे हजारो निवासी शिष्य असत. त्यांच्याकडून कठोर अध्ययन साधना करवून घेत ऋषींनी आपली ज्ञानगंगा प्रवाहित ठेवली. वेदमंत्रासारख्या दिव्य वाङ्मयाची शास्त्रशुद्ध संथा हे ऋषी आपल्या शिष्यांना देत असत. या शिष्यांचे अध्ययन पूर्ण झाले की, ते स्वतःच्या शिष्यांकरवी ही ज्ञानपालखी पुढे नेत असत. अशा या शिष्यपरंपरेने ऋषिप्रणित सर्व साहित्य आजही संजीवन राहिले आहे. या महान ऋषींचे फक्त आध्यात्मिक विषयावरच ग्रंथ आहेत असे नसून ज्ञानविज्ञानाच्या सर्व क्षेत्रात त्यांचे प्रबुद्ध वाङ्मय आहे. वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, औषधशास्त्र, स्थापत्य, खगोलशास्त्र, ज्योतिष, साहित्य, कला सर्वातच त्यांचे बहुमोल लेखन आहे आणि ते आजही उपलब्ध आहे.

आज आपण एका अत्यंत तेजस्वी ऋषीवरांची माहिती घेऊ या. त्यांचे नाव अंगिरस. हे ब्रह्माचे मानसपुत्र होत. यांची निर्मिती साक्षात अग्निदेवातून झाली, असे मानतात. अंगिरसांनी प्रदीर्घ काळ परब्रह्माचे ध्यान करीत तपश्चर्या केली. त्यामुळे त्यांना ब्रह्मतेज प्राप्त झाले होते. दक्ष प्रजापतीच्या कन्या स्मृतीव स्वधा यांच्याशी अंगिरसांचा विवाह झाला होता. यांना दहा पुत्र आणि सात कन्या होत्या. देवगुरु बृहस्पती अंगिरस ऋषींचेच पुत्र होत.

पृथ्वीवरील अग्नीचा शोध अंगिराऋषींनी लावला असे अत्रीमहर्षी म्हणतात,

जत्वां अग्ने अंगिरसः<br>गुहा हितं अनु अविन्दन्<br>शिश्रियाणं वने वने ।<br>सः जायसे मध्यमानः<br>सहः महत् त्वां आहुः<br>सहसः पुत्रं अंगिरः ।।ऋ. मं.५सू.१०.६



भारतीय ऋषी

डॉ. अनुराधा कुलकर्णी

हे अग्ने अरणीरूप गुहेमध्ये गुप्त असलेल्या व वृक्षावृक्षामध्ये राहणाऱ्या तुला अंगिराऋषींनी शोधून प्राप्त करून घेतले. दोन अरण्या एकमेकींवर सामर्थ्यपूर्वक घासून तू निर्माण होऊ शकतोस, याच कारणाने अंगिरा ऋषींनी तुला "बलपुत्र'' संबोधिले आहे.

अग्निपुत्र असलेले अत्यंत तेजस्वी ऋषी म्हणजे अंगिरस महर्षी हे होत. अग्नीतून निर्माण झाल्याने त्यांना अंगिरस नाव मिळाले.

ऋग्वेदात अंगिरसाच्या ऋषिकुळाचा गौरव केला असून सर्व आंगिरस ब्रह्मस्तोत्रे गाणारे व ब्रह्मदेवाचे पुरोहित आहेत, असे मंत्रद्रष्ट्या वसिष्ठांनी म्हटले आहे (७.४२) तसेच ऋग्वेदाच्याच दहाव्या मंडलातील बासष्टाव्या सूक्तात वेदमंत्रद्रष्टे मनुपुत्र नाभानेदिष्ठ यांनी अंगिरसांचे स्तवन केले आहे,

ये ऋतेन सूर्य आरोहयन् दिवि अप्रथयन् पृथिवीं मातरं वि ।

सुप्रजास्त्वं अंगिरसः वः अस्तु प्रति गृभ्णीत मानवं सुमेधसः ।।ऋ. मं.१०सू.६२.३

हे बुद्धिमान अंगिरस कुलोपन्न ऋषींनो, तुम्ही तुमच्या सत्यस्वरूप यज्ञीय सामर्थ्याने सर्वप्रेरक सूर्याची द्यू लोकात स्थापना केली आहे, सूर्यासारखेच तुम्ही जगात तळपत आहात. सर्व निर्मात्या भूमातेला तुम्ही तुमच्या सत्कार्यरूप यज्ञकर्मांनी समृद्ध व कीर्तिमान केले आहे. तुमच्या दिव्य संस्काराने तुम्हाला उत्तमच संतती प्राप्त होईल. मनुपुत्र नाभानेदिष्ठाचा तुम्ही कृपा करून स्वीकार करा. अंगिरस हे स्वायंभुव मन्वतरातील सप्तर्षींपैकी एक. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र. यांची ब्रह्माच्या डोक्यापासून उत्पत्ती झाली. हे ब्रह्याचे ज्येष्ठ पुत्र. यांना प्रजापतीही म्हणतात. भाद्रपद शुक्ल पंचमी ही अंगिरा (अंगिरस) जयंती. हिलाच ऋषीपंचमीही म्हणतात. अंगिरस चारही वेदांचे तज्ज्ञ होते. उपनिषदे, व्याकरण, पुराणे यातही त्यांचे कार्य होते. ते शंकराच्या वरदानाने उत्पन्न झाले.

**(पूर्वार्ध)**

(Email - anuradha.klkrn@gmail.com <mailto:anuradha.klkrn@gmail.com>)

**ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा !!**<br>**काय भुललासी वरलीया अंगा !!**

# काय भुललासी वरलीया अंगा !



संत चोखोबा मेळा महाराज यांच्या अभंगातील या ओळी... किती गाभार्थ आहे या ओळींमध्ये. ते म्हणतात "ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा." म्हणजे ऊस जरी दिसायला चांगला दिसत नसला, वाकडा तिकडा दिसत असला तरी त्याचा रस गोड असतो... म्हणून आपण त्याच्या वरच्या आवरणाला भुलू नये... जर आपण तसे न करता उसाच्या वरच्या आवरणाला भुललो म्हणजेच त्याचा आकार वाकडा आहे, कठीण आहे असं म्हणून जर त्याला खाऊन बघितले नाही तर त्याच्या आतल्या रसाची गोडी आपण कधीच चाखू शकणार नाही... ऊस आपण सगळेच खातो, त्याचा रस ही सगळे पितात; परंतु संत चोखोबांनी उसामधील गुण बघितले ते त्यांनी अभंगांमध्ये सहजपणे मांडले... किती सोप्या शब्दांत त्यांनी जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन उलगडून सांगितला आहे.

रंग, रूप, आकार ही सगळी बाह्य आवरणे आहेत. आपण नेमकं या आवरणांना भुलतो. अंतर्गुणांच मूल्यांकन करतच नाही.

बाजारात आपण एखादी वस्तू खरेदी करताना ती नीट पडताळून पाहातो, त्याचं मूल्यांकन करतो आणि मगच आपण ती खरेदी करतो. त्याचप्रमाणे जीवन जगताना आपल्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींची किंवा व्यक्तींची पडताळणी करणे किंवा मूल्यांकन करणे गरजेचे आहे. काही गोष्टी कितीही सुंदर दिसत असल्या, तरी गरजेचे नाही की त्या तशाच असल्या पाहिजेत त्यांचे मूल्यांकन केल्यास समजतं की आपण समजलो त्यापेक्षा कितीतरी पटीने त्या गोष्टीचे मूल्यांकन कमी आहे; परंतु काही गोष्टी आपल्याला नकोशा वाटल्या, आवडत नसल्या तरी त्याचे मूल्यांकन केल्यास समजतं की आपण समजलो त्यापेक्षा कितीतरी पटीने त्या गोष्टींचे मूल्यांकन अधिक आहे. आपल्या डोळ्यांना दिसलेल्या प्रत्येक गोष्टीचे बाह्य स्वरूप जितके सुंदर आहे तितकेच तिचे अंतःस्वरूप देखील सुंदर असेल असे नाही ते कुरुप ही असू शकते. तसेच आपल्या डोळ्यांना दिसलेल्या प्रत्येक गोष्टीचे बाह्य स्वरूप जितके कुरुप तितकेच तिचे अंतःस्वरूप कुरुपच असेल असे नाही ते सुंदर ही असू शकते. हीच गोष्ट आपल्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्तींसाठी लागू होते. आपल्या आयुष्यात जन्मापासून ते मृत्यूपर्यंत कितीतरी व्यक्ती येतात, जातात पण आपण त्यांना पडताळून पाहात नाही किंवा त्यांच्यातील गुणांचे मूल्यांकन करत नाही. आपल्याकडे एक म्हण आहे "जे चकाकते ते सारे सोने नसते" ही म्हण आपल्या दैनंदिन जीवनात खूप उपयोगाची आहे. आपल्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्ती मग त्या ओळखीच्या असोत अथवा अनोळखी असोत आपण त्यांचे स्वरूप अथवा चरित्र त्यांच्या वरवरच्या दिसण्यावर ठरवू नये. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आपल्याला अनेक लोक भेटतात. सुरुवातीला ते लोक खूप प्रेमळ आणि मैत्रीपूर्ण व्यवहार आपल्याबरोबर ठेवतात; परंतु जेव्हा आपण त्यांना ओळखायला लागतो तेव्हा आपल्याला त्यांच्यातले गुण, त्यांचा स्वभाव दिसू लागतो आणि तेव्हा कळतं की ते जे दिसत होतं ते फसवं होतं. त्यांचे खरं अंतःस्वरूप त्यांच्या बाह्य स्वरूपा आड बनावट मुखवट्यामागे लपलेलं होतं. त्याचप्रमाणे, आपल्याला बाजारात अनेक आकर्षक वस्तू आढळतात. आपल्याला त्या खरेदी करून घरी आणण्याची इच्छा होते; परंतु जेव्हा आपण त्यांचा वापर सुरू करतो तेव्हा आपल्याला लवकरच लक्षात येते की त्या वस्तू वरून चांगल्या दिसत असल्या तरी त्या कमी दर्जाच्या आहेत आणि म्हणूनच आपण कोणावरही सहज विश्वास ठेवू नये. एखाद्या व्यक्तीशी जवळचे नाते निर्माण करण्यापूर्वी आपण त्या व्यक्तीला जाणून घेण्यासाठी वेळ





मनाचा गाभारा

अर्चना सरोदे

दिला पाहिजे. तेव्हाच आपण त्या व्यक्तीला पडताळून पाहू शकतो. त्या व्यक्तीच्या गुणांचे मूल्यांकन करू शकतो. त्याचप्रमाणे आपण फक्त चांगली दिसते म्हणून एखादी वस्तू खरेदी करू नये. आपण तिचे मूल्यांकन केले पाहिजे, तिची गुणवत्ता आणि उपयुक्तता तपासली पाहिजे आणि त्यानंतरच आपण ती खरेदी केली पाहिजे. नोकरी आणि व्यवसायाच्या संधींसाठी आणि जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रासाठी हे सूत्र वापरले पाहिजे. दूरवरून अनेक गोष्टी चांगल्या आणि आकर्षक वाटत असल्या तरी त्यांचे वास्तव पूर्णपणे वेगळे असते. त्याचप्रमाणे ज्या गोष्टी निकृष्ट दर्जाच्या वाटतात वास्तविक पाहता त्या गोष्टी उच्च दर्जाच्या असतात.

नेहमी हे लक्षात ठेवले पाहिजे की, जे वाईट दिसते ते प्रत्यक्षात चांगले असू शकते आणि जे शाप वाटते ते प्रत्यक्षात वरदान असू शकते. चुकीच्या गोष्टींवर अथवा व्यक्तींवर विश्वास न ठेवण्याची काळजी घेत असताना, हे लक्षात घेतले पाहिजे की योग्य गोष्टी किंवा व्यक्तींवर विश्वास न ठेवणे ही देखील एक सर्वात मोठी चूक असू शकते आणि म्हणूनच जीवनात प्रत्येक गोष्टीचे मूल्यांकन करणे, त्या गोष्टीची गुणवत्ता तपासणे हे अतिशय गरजेचे आहे...

# नित्यनेम म्हणजे काय ?

नित्यनेम म्हणजे काय ? नित्याचा जो नियम तो खरा नित्यनेम होय.

नित्य कोण? जो कधीही बदलत नाही तो. याचा अर्थ, जो पूर्ण शाश्वत आहे तोच खरा नित्य होय. म्हणून नित्य म्हणजे भगवंत समजावा. त्याचा नियम करायचा म्हणजे काय करायचे? नियम करणे याचा अर्थ नियमन करणे, निग्रह करणे, वश करून घेणे, स्वाधीन ठेवणे हा होय. आपले मन भगवंताच्या स्वाधीन करणे, त्याच्या ठिकाणी ते नेहमी ठेवणे याचे नाव नित्यनियम होय. आजच्या आपल्या मनाच्या अवस्थेमध्ये ते सर्वस्वी भगवंताच्या स्वाधीन करता येत नाही आणि देह हा जड, अशाश्वत असल्यामुळे देहाने, नित्य आणि शाश्वत अशा भगवंताचा नियम घडणे शक्य नाही. म्हणून देहाने घेता येत असून देहाच्या पलीकडे असणारे आणि सूक्ष्म असल्यामुळे भगवंताशी शाश्वत संबंध असणारे, असे भगवंताचे नाम अखंड घेणे हा आपला खरा नित्यनियम आहे. इतर सर्व गोष्टी, शास्त्राची बंधने, पोथी वगैरे वाचणे, स्नानसंध्यादि नित्यकर्मे वगैरे पाळावी पण त्याचा हट्ट वा आग्रह असू नये. कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे नाम मात्र सोडू नये. एवढाच हट्ट क्षम्य आहे.



अध्यात्म

ब्रह्मचैतन्य<br>श्री गोंदवलेकर महाराज

शुद्ध भावनेने नाम घेतले की भगवंत दर्शन देतो. शुद्ध भावनेचे फळ फार मोठे आहे. पुष्कळ वेळा गरीब आणि अशिक्षित लोकच या बाबतीत श्रेष्ठ असतात. आपण नाम घेत जावे. नामाने भावना शुद्ध होत जाते. खरे म्हणजे, मनुष्याला जिवंत राहण्यासाठी हवेची जितकी गरज आहे तितकीच, किंबहुना त्याहूनही जास्त जरुरी, परमार्थामध्ये भगवंताच्या नामाची आहे. भगवंताच्या नामाशिवाय न राहण्याचा संकल्प प्रत्येक माणसाने केला पाहिजे. भगवंत हट्टाने किंवा उगीच केलेल्या कष्टाने साध्य होत नाही. तो एका प्रेमाने वश होतो. प्रेमामध्ये हट्ट आणि कष्ट झाले तर शोभतात आणि हिताचे होतात. आपण भक्तांचे प्रेम न पाहता त्यांचा हट्ट आणि कष्ट तेवढे बघतो. जो मनुष्य साडेतीन कोटी रामनामाचा जप करील त्याला भगवंताच्या प्रेमाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. शंका या फार चिवट असतात, त्या मरता मरत नाहीत. शिवाय, काही शंका आचरणाने आणि अनुभवानेच नाहीशा होतात. म्हणून, मनात शंका असल्या तरी नाम सोडू नये. सतत नाम घेत गेल्याने मन स्वच्छ होत जाते आणि सर्व शंका आपोआप विरून जातात. लंकेमध्ये रावणाच्या बंदिवासात अशोकवनात सीता असताना, तिच्या सान्निध्याच्या प्रभावामुळे तिथली झाडे, पक्षी, दगड या सर्वांना रामनामाचे प्रेम लागले होते, असे वर्णन आहे. रामनामाचे प्रेम आणि भगवंताचे प्रेम ही दोन्ही एकच आहेत. नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे ह्यातच जीवनाचे सर्वस्व आहे.

**तात्पर्य :** ध्रुवासारखी नामावर निष्ठा पाहिजे. प्रत्यक्ष भगवंत समोर आले, तरी त्याने नाम सोडले नाही.

# स्तुती

आपल्या जीवनांत परमेश्वराचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. तो आहे म्हणून सर्व चाललेले आहे. तो नाही तर काही नाही ही वस्तुस्थिती आहे. तो दिसत नसला तरी सर्व चाललेले आहे ते त्याच्यामुळे चाललेले आहे. विद्युत ऊर्जा दिसत नसली तरी सर्व चाललेले आहे ते विद्युत शक्तीमुळेच, ती नाही तर सर्व बंद. विद्युत शक्ती, गुरुत्वाकर्षण शक्तीपेक्षा परमेश्वर अनंत पटीने मोठा आहे. इतका तो मोठा असून सुद्धा माझ्यामुळे जग चाललेले आहे असे तो कधीच म्हणत नाही. ज्ञानेश्वरीत सुंदर सांगितलेले आहे,

"आकाशे सर्वत्र वसावे वायूने क्षणभरी उगे नसावे, पावके दहन करावे ही आज्ञा माझी''



जीवन संगीत

सद्‌गुरू वामनराव पै

आकाशाने सर्वत्र वसावे. वायूने कधीही थांबू नये, वाहत राहावे. अग्नीने दहन करावे, पृथ्वीने भूमात्रांना धरून ठेवावे ही त्याची आज्ञा आहे. आज्ञा माझी म्हणजे काय? सत्ता माझी. सत्ता म्हणजे काय? सत्ता म्हणजे शक्ती, सत्ता म्हणजे असणे. सत्य, सातत्य असणे म्हणजे सत्. ही सत्ता म्हणजे त्याच्या केवळ अस्तित्वामुळे हे सर्व चाललेले आहे. त्याच्या सत्तेने सर्व चाललेले असते पण तो कधीच कुणाला येऊन सांगत नाही की हे मी केले तुम्ही त्याला काहीही केले तरी तो तुमच्या स्तुतीला भाळत नाही. स्तोत्र म्हटले की तो खूश ही तुमची कल्पना आहे. लोक स्तोत्र म्हणतात कारण त्यांना देव प्रसन्न होईल असे वाटते. ते खरे नाही, कारण असा देव प्रसन्न होत नाही. खरेतर तुम्ही देवाची प्रार्थना करता, विश्वप्रार्थना म्हणता, स्तोत्र म्हणता म्हणजे काय करता? देव म्हणजे काय? हे माहीत नसेल तर त्या स्तोत्राला काहीच अर्थ नाही. देव म्हणजे काय हे आधी कळले पाहिजे. "आधी देवासी ओळखावे, मग तयाचे भजन करावे.'' आधी हा शब्द महत्त्वाचा आहे. देवाची ओळख नाही, देवाला कधी पाहिलेले नाही. स्तोत्र म्हणणे चांगलेच, ते वाईट नाही. स्तोत्र म्हणत असताना देवाबद्दल काही माहीत नसेल तर त्या स्तुतीला अर्थ काय? खरा देव कसा आहे हे समजून ते केले पाहिजे. खोटी स्तुती व खरी स्तुती यात फरक आहे. एखादा खरेच चांगले गाणे म्हणत असताना त्याची स्तुती केली तर ती खरी स्तुती पण केवळ त्याला बरे वाटावे म्हणून स्तुती करतो ती खोटी स्तुती. खरी स्तुती व खोटी स्तुती यांत फरक काय? देवाची ओळख झाल्यावर देवाची स्तुती करतो तेव्हा ती देवाला जास्त आवडते. देवाची स्तुती का करायची? देव असा आहे की त्याची स्तुती किती करावी? त्याचे कौतुक किती करावे? त्याच्याबद्दल किती बोलावे? याला काहीही मर्यादा नाहीत. प्रत्यक्षात देव हा आहेच तसा हे मला सांगायचे आहे.

# पर्णी अलग त्याचा सूर

**'ज्ञानान्वितेषु युक्तेषु<br>शास्त्रज्ञेषु कृतात्मसु।<br>न तेषु सज्जते स्नेहः<br>पद्मपत्रेष्विवोदकम्॥'**



हल्ली जरा वेगळं वाचायची सवय लागलीय म्हणून म्हणा किंवा अध्यात्मिक ओढ म्हणून म्हणा पण, अचानक शेवडे सरांच्या लेखात शौनक ऋषींची 'शौनकगीता' याबद्दल वाचनात आले आणि त्यातीलच हा श्लोक नजरेखालून गेला आणि लक्षात आले, 'जसे कमळाच्या पानांवर पाणी टिकून राहत नाही, तसे ज्ञानवंत, परमात्म्याशी एकरूप झालेले संत, धर्मशास्त्राचे जाणकार आणि मनाने शुद्ध असलेल्या लोकांनाही आसक्तीची बाधा होत नाही.'

मग ही आसक्ती विरहित स्थिती म्हणजेच तरी काय हा प्रश्न सहजच मनात येतोच, तर शुद्ध अध्यात्माचा सर्वोच्च सोपान म्हणजे आसक्ती विरहीत स्थिती होय. अर्थात जगताच्या मोहात न अडकता जे परमात्म्याच्या चरणी लीन झालेले आहेत आणि त्यांची वृत्ती पवित्र कमळाच्या पानासारखी असते, त्यांच्यावर सांसारिक आसक्तीचे जल हे टिकत नाही. पण जर 'हे जग क्षणभंगुर आहे तसेच जे काही आहे, ते परमेश्वरच आहे आणि मनुष्य त्याच्या इच्छांनी आणि वासनांनी बांधला गेला की त्याचे खरे स्वरूप हरवते' हे जर खरे आहे तर मग याचा अर्थ असा नाही की त्या आत्म्याला मुक्ती नाही. प्रत्येकाला आत्मज्ञानाची वाट खुली असते.



ऋतुराज

ऋतुजा केळकर

अर्थात आत्मज्ञानाची वाट म्हणजे स्वतःला ओळखणे, स्वतःच्या अंतरात्म्याशी संवाद साधणे. जो मोहाचा त्याग करून हे सत्य शोधतो, तो स्वतःला आणि जगाला नव्या नजरेतून पाहतो. त्याचेच जीवन हे निखळ तर होतेच शिवाय मन ही शांत होते आणि अखेरीस तो फक्त बाह्य सुखांचा गुलाम राहात नाही आणि खऱ्या आनंदाचा साक्षात्कार घेतो. अर्थात याच्या पुढचा टप्पा म्हणजे मुक्ती आणि मनशांती की जी मिळवणे दुरापास्तच, पण जो स्वतःला ओळखतो, तो कोणत्याही बाह्य परिस्थितीने विचलित होत नाही. त्याचा प्रवास सुख आणि दुःख यांच्या पलीकडे जातो आणि तो शाश्वत सत्याशी एकरूप होतो. मग त्याचे जीवन याच तत्वज्ञानाचे प्रकटीकरण होते.

अर्थात हे प्रकटीकरण इतके सोपे नाहीच. सर्वच प्राणीमात्रांच्या जीवनात असंख्य मोह आणि आकर्षण येतात, पण जो त्यापासून मुक्त होतो, तोच खऱ्या ज्ञानाचा अधिकारी ठरतो. मग अशा जीवनक्रम करणाऱ्या मानवाचे जीवन ही भक्तिरस आणि आत्मज्ञान हेच अंतिम सत्य आहे.

आता वरील श्लोकाबद्दलच बोलायचे झाले तर सर्वच संतांच्या वचनांमध्ये एक गूढ आहे की जे, त्यांनी स्वतःच्या अनुभवातून सांगितले की, मोहमयी जगताची आसक्ती ही जसे कमळाच्या पानावर टिकू शकत नाही, तसेच ज्यांनी आत्मज्ञान प्राप्त केले आहे, त्यांना या जगाची आसक्ती कधीही स्पर्श करू शकत नाही. त्यामुळे आपणही त्यांच्या विचारांची कास धरून आपले जीवन शुद्धतेकडे नेले पाहिजे.

कसं आहे ना की, आत्मज्ञानाच्या दिव्य प्रकाशात मन निर्मळ होते आणि मोहाचे काळे ढग दूर होत जातात. ज्यांनी सत्याचा साक्षात्कार घेतला, त्यांना सांसारिक आसक्तीचा लवलेशही लागत नाही. ते नित्यमुक्त असून त्यांचे चित्त स्थिर, विचार शुद्ध आणि जीवन निर्मळच असते. जगातील मोह, माया आणि आकर्षण हे फक्त धुक्याचे आभास आहेत. जीवनाची पायवाट धूसर होत गेली की, स्मरणांची सावली मागे रेंगाळत राहते आणि क्षणभंगुरतेच्या धुक्यात हरवलेले आपलेच अस्तित्व आणि ओळखीचे चेहरे विरले की अगदी शब्द देखील अनामिक होतात आणि मग वासनांच्या सावल्यांत कोरडे पडलेले स्पर्श हे क्षितिजाच्या काठावर उभे राहून उरते ती फक्त नजरेत विरलेली चाहूल. मोहाच्या अभ्रांत चित्रात हरवलेली वाट पोहचते मोहाच्याच धूसर कवडशांत रूपांतरीत होऊन आणि हरवल्या आपल्या अस्तित्वाच्या सावलींत विरलेली वाट परत पोहोचते विस्मरणाच्या ओलसर धुक्यात लुप्त, पायवाट बनून आत्मज्ञानरूपी सूर्याच्या तेजाच्या दिशेने, त्यांना या धुक्याचा प्रभाव होत नाही. जसे कमळाच्या पानावर पाणी पडले तरी ते त्यावर टिकत नाही, तसेच आत्मज्ञानी पुरुष सांसारिक बंधनांपासून अलिप्त राहतात. त्यांच्या मनातील विचार शुद्ध, निर्मळ आणि निर्लेप असतात.





कसं आहे ना की, मोह आणि माया हे माणसाला कधीही शांत बसू देत नाहीत. एका इच्छेमधून दुसऱ्या इच्छेचा जन्म हा होतच राहतो आणि मग जीवनभर याच प्रवासात माणूस अडकतो. त्याला वाटते की, कोणत्या तरी वस्तूने त्याचे सुख पूर्ण होईल, पण तो जसे पुढे जातो, तसे नवनवीन इच्छांच्या साखळ्या त्याला अडकत असतात. पण जो आत्मज्ञानी आहे, तो या भ्रमाच्या जाळ्याला भेदतो. त्याला आनंद बाहेरून शोधावा लागत नाही. जीवनात कितीही वैभव असो, कितीही सुखसंपत्ती असो, तरी त्यांचा प्रभाव शुद्ध आत्म्याला पडत नाही. तो त्यांच्याशी एकरूप होत नाही, कारण त्याला त्यांचे खरे स्वरूप समजले आहे. या जगातील मोह आणि सुख यांचे अस्तित्व अस्थायी आहे आणि त्यांना टिकवण्याचा प्रयत्न करूनही उपयोग नाही. आत्मज्ञानी माणूस या सत्याला ओळखतो आणि तो सदा मुक्त राहतो.

म्हणूनच जे शुद्ध अंतःकरणाचे आहेत, त्यांचे जीवन या जगाच्या क्षणभंगुर सुखांपेक्षा अनंततेच्या आनंदात विलीन झाले आहे. त्यांना मान–अपमानाचा परिणाम होत नाही, ना त्यांना धनाची हाव असते. आत्मज्ञानाची वाट ही मोहाच्या विरुद्ध जाते. या वाटेवरून चालणाऱ्या माणसाला हे जग फसवू शकत नाही. तो संसाराच्या मोहात अडकत नाही, कारण त्याच्या डोळ्यांसमोर दिव्य ज्ञानाचा प्रकाश आहे. त्याच्या आत्म्याच्या गाभ्यात निखळ सत्याचे तेज आहे. असे जीवन हेच जीवनाचे सर्वोच्च सार आहे, अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचे झाले तर,

**मोह फुलावा स्वप्नसंगती...<br>स्पर्श तयांचे क्षणभंगुर।<br>स्मरण उरी धुक्याचे कवडसे...<br>पर्णी अलग त्याचा सूर॥**

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

## रियांश कंपनीमुळे नेपाळ, दुबई देशात मिळाली टुरसाठी संधी

गरिबीचे चटके सोसले, | दहा वर्षे किरायाच्या घरात घालविली | कधीकाळी मेस चालविली आणि आज आहेत

# सक्सेस वूमन!!

# प्रियंका शिंदे

## यांचा थक्क करणारा प्रवास

प्रचंड मेहनत,जिद्द,चिकाटी अन् ध्येय असले की यश मिळतेच

◆ सुनिल डोंगरे बीड

घरात अठराविश्व दारिद्र्य, दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत, लहान असतांनाच वडिलांचं निधन झालं.आईने हाताला मिळेल ते काम आणि अपार काबाडकष्ट करुन आम्हा तीन भावंडांचा सांभाळ केला. खरंतर गरीबीचे चटके सोसत आम्ही लहानाचे मोठे झालो. त्यामुळे हौस–मौजमजा नावाची गोष्ट आमच्या आयुष्यात आली नाही. परंतू यातूनच आम्ही खऱ्या आयुष्याचे धडे शिकलो, म्हणूनच लहानपणीचे दिवस आठवले की, आजही डोळ्यात पाणी येतं.माझ्या आईचा संघर्ष आणि पतीने दिलेली खंबिर साथ यामुळेच आज इथपर्यंत आले आहे. संधी प्रत्येकाला मिळते पण त्या संधीचे सोने करता आले पाहिजे.असं म्हणणाऱ्या प्रियंका योगानंद शिंदे यांचा खडतर प्रवास प्रेरक असून ऊर्जा देईल असाच आहे. त्यामुळे दैनिक पुण्यभूमीने टाकलेला हा प्रकाश वाचकांना नक्कीच आवडेल, यात तिळमात्र शंका नाही.



### सामाजिक भूमिका दखल घेण्याजोगी

प्रयंका शिंदे–वडमारे अतिशय संवेदनशील व्यक्तिमत्त्व असून त्यांची सामाजिक भूमिका दखल घेण्याजोगी असून त्या नेहमीच काही ना काही उपक्रम राबविताना दिसून येतात. ज्या समातून आपण आलो आहोत त्याप्रती आपले दायित्व असायलाच हवे.परंतू त्याचबरोबर इतरही लोकांप्रती तसेच दायित्व असले पाहिजे. हाच धागा पकडून प्रियंका शिंदे समाज कार्यातही नेटाने अग्रेसर असतांना दिसतात.

समाजामध्ये वावरत असतांना आपल्या अवतीभवती अनेक लोक असे असतात की, त्यांचे कार्य खरोखरच दखल घ्यावी, असेच असते. बीड शहरातील प्रियंका योगानंद शिंदे त्यापैकी एक आहेत. त्या सांगतात की, वडिलांच्या निधनानंतर आईने आम्हा तीन भावंडांचा सांभाळ केला. आम्हाला कोणतीही गोष्ट कमी पडू नये, यासाठी तिने अतिशय कष्ट उपसले.माझ्यासह बहिण मौसमी, आणि भाऊ निलेश यांना परिस्थितीशी झुंज देत शिकविले. घरात सर्वात मोठी मी असल्याने माझ्या व्यतिरिक्त मोठा करता पुरुष नव्हता.त्यामुळे नकळतपणे अनेक जबाबदाऱ्यांचं ओझं पेलावं लागलं. अगदी कमी वयात लग्न झालं. त्यामुळे जबाबदारीत आणखीन भर पडली. लग्नानंतर शिक्षण होते की नाही अशी चिंता होती.परंतु माझे पती सतिष नानाभाऊ वडमारे यांनी माझ्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. त्यामुळे बंकट स्वामी महाविद्यालयात बीए, आणि केएसके महाविद्यालयात मानसशास्त्र विषयातून एमए पर्यंतचे शिक्षण पूर्ण करता आले. शिक्षण घेतल्यानंतर शासकीय नोकरीच्या प्रयत्नांबरोबरच निमशासकीय नोकरीच्या संधीही मी सतत शोधत होते. चूल आणि मूल ही संकल्पना मला कधीच मान्य नव्हती.महिला शिकून सवरुन मोठी झाली तर त्या समाजाची प्रगतीच होते,यावर माझा ठाम विश्वास होता. त्या विश्वासाला माझ्या पतीने तेवढीच साथ दिली. त्यामुळे कुटुंब सांभाळून २०१४ साली एलआयसीमध्ये विमा सल्लागार म्हणून काम सुरु केले.एवढ्यावरच न थांबता खानावळही चालविली. सतत धावपळ आणि कौटुंबिक जबाबदारी यामुळे आरोग्यावर त्याचा परिणाम झाला.त्यामुळे रियांश नावाच्या कंपनीची औषधे घेतली.त्या औषधांमुळे मला फरक पडल्याचे जाणवले अस प्रियंका शिंदे सांगतात. ज्या रियांश कंपनीच्या औषधामुळे मला फरक पडला त्याच कंपनीचे २०२४ साली काम करण्यास सुरुवात केली. त्यातून वर्षाकाठी सात ते आठ लाख रुपये निव्वळ उत्पन्न कमवित आहे. माझ्या चांगल्या कामाची दखल घेऊन नेपाळ आणि आता दुबई या देशाचा प्रवास करत आहे. ही बाब माझ्यासाठी खरोखरच थक्क करणारी असल्याचे प्रियांका शिंदे आवर्जून सांगतात. एकेकाळी महागडा प्रवास करण्याचेही पैसे नसायचे आज साडेतीन हजार फूट उंचीवरुन विमानाने प्रवास करण्याची संधी खेचून आणण्याचे काम प्रियांका शिंदे यांनी केले आहे, असेच म्हणावे लागेल. हालाखीच्या परिस्थितीवर मात करून स्वतःला सिद्ध करत असताना आईचा संघर्ष डोळ्यासमोर उभा राहतो. लहानपणी पत्र्याच्या आणि त्यानंतर दहा वर्ष किरायाच्या घरात आम्ही राहिलो आज स्वतःच्या मालकीचे टोलेजंग घर आहे. समाजातल्या इतर महिलांना संदेश देताना प्रियंका शिंदे म्हणतात की, महिलांनी चूल आणि मूल इथपर्यंत सीमित राहू नये. माहेर आणि सासर या दोन्हीही ठिकाणच्या कुटुंबीयांनी महिलांना शिक्षणाची दारे खुली करून देत त्यांना संधी उपलब्ध करून दिली पाहिजे.जेणेकरून त्या कोणावरही अवलंबून राहणार नाहीत. आज मला सासरच्या मंडळींनी स्वातंत्र्य दिले म्हणूनच तर मी संधीचे सोने करू शकले आहे.त्यामुळे स्वतःला सिद्ध करत प्रियंका शिंदे सारख्या अनेक महिला यशाला गवसणी घालत आहेत. त्या सर्व महिलांना दैनिक पुण्यभूमी सलाम करतो आहे.

## त्यासाठी असावी लागते जिद्द...



यश अशी गोष्ट आहे की ती प्रत्येकाला आपल्या जीवनात हवीहवीशी वाटते, पण ती प्रत्येकाच्या वाट्याला येतेच असे मात्र नाही. ती दुर्मीळ आहे असेही नाही. पण यश मिळविण्यासाठी खूप परिश्रम करावे लागतात. यश मिळविण्यासाठी खरंतर रुप सुंदर व देखणं असावे लागते असे नाही. उंच, बुटकी, कुरुप, सडपातळ, रंगाने काळी, दृष्टिहीन, विकलांग, ऐकता बोलता न येणारे माणसे देखील जीवनात यशस्वी होतात.त्यासाठी असावी लागते प्रचंड जिद्द, कारण हीच एकमेव गोष्ट आपल्याला यशापर्यंत घेवून जाते.

## दुबई टूरसाठी निवड...

बीड–भिमराज नगर,राजूरिवेस, बीड येथील मूळनिवासी असलेले सतीश वडमारे यांच्या पत्नी प्रियंका वडमारे (शिंदे) या रियांश मल्टिट्रेड प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये प्लॅटिनम डायरेक्टर या रँकवर असून त्या कंपनीचे फूड सप्लीमेंट आयुर्वेदिक प्रॉडक्ट रियांश अमृत ज्यूस व इतर चांगल्या प्रॉडक्टसच्या माध्यमातून लोकांना आरोग्य तसेच आरोग्यासोबत रोजगार देण्याचे कार्य करत आहेत. त्यांना कंपनीचे चांगल्या कामाबद्दल कंपनीतर्फे सहा दिवसाच्या दुबई टूरसाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल प्रियांका शिंदे यांनी कंपनीचे सर्वेसर्वा सीएमडी मधुकर जाधव, एमडी पूजा जाधव तसेच मार्गदर्शक शेख जमील, ब्लू डायमंड यांचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच सोबत असलेले सर्व लीडर्स व कुटुंबातील सर्व सदस्य व मित्र परिवार यांचेही आभार व्यक्त केले आहेत. तसेच लोकांना चांगले आरोग्य देऊन त्यामाध्यमातून चांगल्या रोजगाराचे संधीसाठी ९१३०९३९३९९ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.







◆ **बीड:** प्रियंका शिंदे आणि त्यांचे पती सतिष वडमारे... दुसऱ्या छायाचित्रात त्यांच्या कुटूंबासमवेत